




# पंख फुटलेल्या मुली

लेखिका
प्रगती बाणखेले





लेखिका :
प्रगती बाणखेले

मांडणी
ॲड. शैला जाधव आणि दिपेंन्ती चिकणे

मुद्रक
लेक लाडकी अभियान, सातारा महाराष्ट्र

छायाचित्रे :
कैलास जाधव

निर्मिती :
लेक लाडकी अभियान, सातारा, महाराष्ट्र

देणगी मुल्य : २००/– रुपये


प्रकाशक :©
लेक लाडकी अभियान
४९० अ, गुरुवार पेठ, मुक्तांगण, सातारा
फोन : ०२१६२ – २२१०३१

ईमेल : varshadesh232@gmail.com

# मनोगत

गेल्या तीस वर्षापासून महिला, दलित अल्पसंख्यांक यांच्याबाबत होणारे डीस्क्रिमिनेशन म्हणजेच त्यांना दिल्या जाणाऱ्या दुजाभावाच्या वागणुकी विरुध्द आणि त्यामुळे होणाऱ्या अत्याचाराविरुध्द आम्ही सातत्याने भूमिका घेतली. १९७५ ते १९८५ ही दहा वर्षे जगभरामध्ये महिला दशक म्हणून साजरी केली गेली. यादरम्याने महिलांविषयक अनेक प्रश्न आणि मुद्दे राजकीय विचार मंचावर चर्चेला आले. आम्ही आता महाराष्ट्रात तसेच देशपातळीवरील मुलींच्या कमी होणाऱ्या संख्येबाबत काम करणारी 'डेकॉय ऑपरेशन' करणारी एकमेव संस्था म्हणून ओळखले जातो.

गेल्या तीस वर्षात ही ओळख निर्माण करताना या प्रवासात अनेक महत्त्वपूर्ण टप्पे आले. जन्माला येण्याच्या आधीपासून ते मृत्यूपर्यंत म्हणजेच जीवनभर मिळणाऱ्या दुजाभावाच्या वागणुकी विरुध्द आणि हिंसे विरुध्द संस्थेचा ठराव पारित करुन आम्ही काम करण्याचा निर्णय घेतला. एरवी तक्रारदार महिला आल्यास तिच्या मदतीसाठी आम्ही आंदोलन तसेच न्यायालयीन लढाईचा निर्णय करतो. परंतु आईच्या गर्भामध्ये असताना जिचा



केवळ मुलगी आहे, म्हणून जन्माचा हक्क नाकारला जातो आणि त्यामुळे देशात सहा लाख मुली दरवर्षी गायब केल्या जातात. अतिशय प्रभावी कायदा असूनही त्याची अंमलबजावणी वीस वर्ष होऊ शकली नाही. आम्ही निर्णय करुन जाणीवपूर्वक जवळजवळ पन्नास डेकॉय ऑपरेशन्स करुन गर्भलिंग निदान करताना डॉक्टर्सना रंगेहात पकडले आणि लेक लाडकी अभियान म्हणून देशपातळीवर दखल घेण्या एवढे काम उभे केले. एवढेच पुरेसे नव्हते, मुलींनी जन्माला येणे महत्त्वाचे आहेच आणि त्याबरोबरच दुजा भावाने मिळणाऱ्या वागणुकीला विरोध करणारी एक पिढी घडवणे गरजेचे वाटले; म्हणून इंग्रजीमध्ये म्हटल्याप्रमाणे 'कॅच देम यंग' म्हणजेच तरुण माणसेच बदल घडवतील, त्या बदलासाठी त्यांना सक्षम बनवा हीच भूमिका घेऊन आम्ही बीड जिल्ह्यामध्ये शिरुर कासार तालुक्यात दोन वर्षात ५३ ग्रामपंचायती, ९६ वाड्या-वस्त्यांवर, १८० गटांमधून, २५८२ मुलींसोबत समतेच्या दिशेने पावले टाकण्यास सुरुवात केली.

बालविवाह थांबवणे, मुली शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सक्षमपणे राहतील असे बघणे, कौशल्य आणि व्यवसाय प्रशिक्षणाच्या अपारंपारिक संधी उपलब्ध करणे आणि त्याद्वारे त्यांच्यातील आत्मविश्वास जागृत करुन चुकीच्या गोष्टींना 'नाही' म्हणण्याचे त्यांच्यात धाडस निर्माण करणे अशा पध्दतीने प्रयत्न केला. तिला माणूस म्हणून जगताना किमान संधी आणि सुविधांचा लाभ मिळावा यासाठी आम्ही कायम प्रयत्नशील राहिलो. हा सगळा प्रवास आणि झालेली प्रक्रिया आपणासमोर मांडला. शासन स्तरावर 'बेटी बचाव बेटी पढाव' अशी घोषणा देताना गेल्या पाच वर्षात देशपातळीवर काहीसे प्रयत्न केले असे सांगितले जाते. या पार्श्वभूमीवर आम्ही केलेला प्रयत्न पाहणे त्रयस्थपणे त्याचे मुल्यमापन होणे आणि या प्रक्रियेचा इतिहास लिहिला जाणे आवश्यक वाटले म्हणून संवेदनशील आणि वैचारिक स्पष्टता असणाऱ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर पत्रकार म्हणून काम करत असलेल्या प्रगती बाणखेले यांना आम्ही विनंती केली की, शिरुरला येऊन आमच्या प्रवासातील सर्व सहप्रवाश्यांशी बोलून या सर्व प्रक्रियेचा लेखाजोखा मांडावा.

आज बीड जिल्ह्यातील मुलींची संख्या वाढती आहे आणि सातत्याने वाढताना दिसत आहे. तसेच, भविष्यकाळात बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील बालविवाह, बालिकांचे मृत्यू, बालिकांवरील अत्याचार, अन्याय कौटुंबिक हिंसा थांबावी, शिक्षणाच्या दर्जेदार संधी या सर्व लेकींना मिळाव्यात यासाठी लेक लाडकी अभियान प्रयत्नशील राहणार आहे. मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होणारे कामगार मोठ्या प्रमाणात बालकामगारांसाठी आणि कापूस वेचण्यासाठी मुलींचा वापर आणि शिक्षणाच्या सर्व स्तरावर ती पूर्णपणे दुर्लक्षित राहिली आहे असे लक्षात आले. त्याचबरोबर लहान मुलींनी आई होण्याच्या बाबतीत सुध्दा अग्रेसर असणारा हा जिल्हा खूप मोठ्या प्रमाणावर मुलींची पळवापळवी करणे, अत्याचार या सर्वांमध्ये हा जिल्हा आघाडीवर असल्याचे जाणवत होते. याच जिल्ह्यातील एक छोटा तालुका शिरुर कासार आम्ही निवडला आणि एक प्रक्रिया करण्याचे ठरवले, महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाने खास करुन तालुका आरोग्य अधिकारी आणि त्यांच्या आशाताईंनी या सर्व प्रक्रियेमध्ये सक्रिय सहभाग द्यायाचे कबूल केले आणि म्हणूनच दोन-अडीच वर्षे सातत्याने बालविवाह थांबविणे, मुलींना व्यवसाय प्रशिक्षण देणे आणि चुकीच्या गोष्टींना 'नाही' म्हणण्याची ताकद निर्माण करेण असा आगळावेगळा प्रयत्न आम्ही मुलींसोबत केला. तो सगळा अतिशय रोमांचकारी असा अनुभव जगासमोर मांडला. तो मांडत असताना या सर्व

मुलींना स्वत:चं म्हणणं जनसुनवाई च्या माध्यमातून जगासमोर मांडता येण्याची ताकद देता आली. मुलींचे हे सगळे प्रश्न महाराष्ट्र राज्य बालहक्क आयोगासमोर मांडायचे ठरले. त्याप्रमाणे बालहक्क आयोगाने शिरुर कासार येथे यायचे कबूल कले. त्याप्रमोण प्रशासनातल्या सर्व संबंधित विभागांना निमंत्रित केले गेले. संपूर्ण तालुक्यामध्ये फार मोठी प्रक्रिया आम्ही पूर्ण केली. त्यातूनच एक सुंदर अशी माहिती तयार झाली. शिरुर तालुक्यातील सर्व वाडी वस्त्यांवर जाऊन मुलींचे असणारे प्रश्न, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि हे सगळे प्रश्न आयोगासमोर मांडले. आम्ही गूगल वरती शोधले तेव्हा आमच्या लक्षात आले की, देशातील ही पहिलीच जनसुनवाई आहे जिथे मुलींनी स्वत: पुढे येऊन आपले प्रश्न आयोगासमोर मांडले आणि पहिल्यांदाच अशा प्रकारची जनसुनवाई घेण्याचा आणि ते धाडस शिरुर कासार येथील किशोरी यांनी दाखवले, लेक लाडकी अभियानाला पुढाकार घेण्याचा मानही मिळाला याचा आनंद आहे.

हा सगळा प्रवास जिल्ह्याचा कमीपणा दाखवण्यासाठी नाही, तर मुलींचे बालविवाह थांबविणे, त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येता यावे आणि खऱ्या अर्थाने 'बेटी बचाव, बेटी पढाव' ही घोषणा न राहता मुलींच्या आयुष्यात एक सकारात्मक बदल घडावा म्हणून हा सर्व प्रवास आम्ही आपणासमोर मांडतो आहे. हे पुस्तक केवळ ललित लिखाण नसून हे आमच्या सर्व प्रवासाचे अनुभव कथन आहे. महाराष्ट्र शासनाने मुलींचे बालविवाह थांबवणे आणि मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत, महिला आयोग असेल अथवा आरोग्य विभाग असेल, या सर्व  संबंधित विभागाने तालुक्यातील मुलींच्या प्रश्नांची नोंद घ्यावी. यासाठी हे पुस्तक आम्ही प्रसिध्द करीत आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिवशी म्हणजेच १४ एप्रिल रोजी हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हाला आनंद आहे. ज्या बाबासाहेबांना हिंदू कोड बीलाच्या आग्रहाखातर स्त्रियांच्या हक्कासाठी एक पुरुष असुनही कायदामंत्री म्हणून राजीनामा दिला त्यांच्या जयंतीदिवशी स्त्रियांचे हक्काचे पुस्तक त्यांच्या आयुष्यात चांगली पहाट यावी त्यांनी विकासाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकावे म्हणून हा वेगळा दस्त ऐवज समाजासमोर मांडता आला याचा आनंद आहे.

ॲड. वर्षा देशपांडे

# प्रस्तावना

नमस्कार,

दोन वर्षापूर्वी बीड जिल्ह्यात बालविवाहाच्या प्रश्नावर वार्तांकन करण्यासाठी फिरत होते. तेव्हा शिरुर कासार तालुक्यात अनेक गावांत गेले. तिथल्या मुली, महिला आणि पुरुषांशी बोलले. अधिकारी, डॉक्टर, शिक्षक, पोलिस, समाजसेवी संस्था, राजकीय नेते यांच्याशीही संवाद साधला.

त्याच दरम्यान 'युएनएफपीए' सोबत ' लेक लाडकी अभियाना' चे काम या तालुक्यात सुरु होते. किशोरवयीन मुलींसाठी ते काम करत होते. ऊसतोड मजुरांच्या या तालुक्यात दुष्काळापासून सुरु होणारे अत्यंत गुंतागुंतीचे अर्थिक, सामाजिक प्रश्न मुळातून सोडविण्यासाठी त्यांनी सुरु केलेले प्रयत्न मला महत्त्वाचे वाटले. बालविवाहाच्या प्रश्नाला केवळ कायद्याची कडक अंमलबजावणी हेच उत्तर नाही तर समाजप्रबोधन हवं. त्याशिवाय मुलींचे शिक्षण, आरोग्य, सुरक्षा, आत्मनिर्भरता यावरही काम करण्याची गरज ओळखून एकाच वेळी अनेक आघाड्यांवर त्यांच काम सुरु होतं. या कामात अनेक अडचणी होत्या. स्थानिक लोक सोबत असले तरी अनंकाचे हितसंबंध अडकल्याने अडथळेही आणले जात होते. पण कशामुळेही अजिबात विचलित न होता काम सुरु राहिलं. अभियानाच्या कार्यकर्त्यांनी अनेक बालविवाह रोखले. योग्य प्रबोधन केल्यावर काही विवाह पालकांनी स्वत:च थांबवले. मुलींना शाळेत जाण्यासाठी सायकली, गावापर्यंत एसटी बस नेण्यासाठीचे यशस्वी प्रयत्न, पडलेल्या शाळेच्या दुरुस्तीसाठी पाठपुरावा, शाळेची नवी इमारत असे शिक्षणासाठीचे प्रयत्न झाले. मुलींना आरोग्य प्रशिक्षण मिळालं. त्या स्वत:विषयी अधिक सजग झाल्या. आधीच्या बुजऱ्या मुली आणि नंतर वेगवेगळे उपक्रम, पथनाट्ये, एकांकिका यातून आत्मविश्वासाने निर्धास्तपणे व्यक्त होणाऱ्या मुली हा फरक मी स्वत: अनुभवला.

सगळ्यात मोठी गोष्ट होती ती मुलींना कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना आत्मनिर्भरतेच्या वाटेवर घेऊन जाण्याची. मुलींना नर्सिंग, ब्युटी पार्लर, ड्रायव्हिंग, संगणक प्रशिक्षण अशा कौशल्यांचे, छोट्या कालावधीचे, मोफत प्रशिक्षण देण्यात आले. त्यासाठी राज्य सरकारच्या संस्थांना सहभागी करुन घेण्यात आलं. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर मुलींना नोकऱ्या, रोजगार मिळतील यासाठी खास प्रयत्न करण्यात आले. मुली स्व:च्या पायावर उभ्या राहिल्या.

आर्थिक निर्भरता ही स्वातंत्र्याच्या मार्गावरचं पहिलं पाऊल असतं. या स्वातंत्र्यासोबत येणारी जबाबदारी घ्यायलाही मुली तयार होत आहेत. या बदलात ' युएनएफपीए' सोबत ॲड. वर्षा देशपांडे आणि त्यांचे कार्यकर्ते, या प्रकल्पाच्या निमित्ताने अभियानाशी जोडलेले तज्ज्ञ मार्गदर्शक, प्रकल्पाची जबाबदारी वाहणारी स्थानिक माणसं, मुली, मुलींचे पालक असं एक मोठं कुटुंबच तयार झाल आहे.

एका मोठ्या बदलाची साक्षीदार होण्याची संधी मला वार्तांकनाच्या निमित्ताने मिळाली होती. या प्रकल्पात सहभागी असलेल्या काही प्रतिनिधिक व्यक्तींवर एक पुस्तिका करायची असं ठरलं. ती मी लिहावी, अशी सूचना वर्षाताईंनी केली तेव्हा ' हो' म्हणाले खरी, पण रोजच्या कार्यालयीन कामातून आणि अंगभूत आळसामुळे ते सतत लांबणीवर पडत होतं. वर्षाताई, शैलाताई चिकाटीने पाठपुरावा करत होत्या. अखेर मनावर घेऊन काम पूर्ण केलं. शिरुर कासारमधल्या या प्रयोगात सहभागी होऊन आयुष्य बदलून गेलेल्या मुलींविषयी, त्यांना प्रशिक्षण, प्रोत्साहन देणाऱ्या मार्गदर्शकांविषयी वाचून वाचकांना तिथल्या परिस्थितीविषयी जाणीव झाली आणि इतर ज्या मुलींना सक्षमीकरणाचं वारं न लागलेल्या अशा हजारे उमलत्या किशोरींसाठी काही करावं वाटलं तर ते या पुस्तिकेचे यश असेल.

धन्यवाद !

प्रगती बाणखेले

# अनुक्रमणिका


| अ.क्र | तपशील | पान.क्र |
|---|---|---|
| १ | आम्ही मोठ्या होतोय | १ |
| २ | स्व कमाईचं सुख | ४ |
| ३ | आत्म निर्भरतेचे सुकाणू | ७ |
| ४ | फोटोशॉपची जादू | ९ |
| ५ | स्वप्नातलं सौंदर्य | ११ |
| ६ | लढवय्यी | १३ |
| ७ | स्वच्छतेची दूत | १६ |
| ८ | किशोरींची मैत्रीण | २० |
| ९ | बदलाची साक्षीदार | २४ |
| १० | विश्वासाचं नेटवर्किंग | २७ |
| ११ | सक्षमीकरणाची वाट | ३१ |
| १२ | मुलींना घडविताना | ३४ |
| १३ | व्यक्तिमत्व विकासाचा मंत्र | ३७ |
| १४ | स्वावलंबनाचा किबोर्ड | ४० |
| १५ | परिवर्तनाचा वाहक | ४२ |
| १६ | आरोग्य सेवा ते समाजकार्य | ४५ |
| १७ | आरोग्यरक्षक आणि समाजसेवकही | ४९ |
| १८ | संपर्काची साखळी | ५२ |
| १९ | कलावंत कार्यकर्ता | ५५ |
| २० | संघर्षाच्या शिलेदार | ५८ |

# आम्ही मोठ्या होतोय ..!

प्रज्ञा बडे आणि सारिका पाखरे

या दोन छोट्या चुणचुणीत मुली सोबतच्या मुलींचे बालविवाह होताना बघतात, त्यांची बदलेली आयुष्य बघताना व्याकूळ होतात. पण ही परिस्थिती बदलण्याचा चंग त्यांनी बांधला आहे. शिकून स्वत:चे आणि आपल्या परिसरातल्या मुलींचे आयुष्य बदलून टाकायचं त्यांनी पक्क ठरवलं आहे.

प्रज्ञा बडे आणि सारिका पाखरे या शिरुरजवळच्या बडेवाडीतल्या दोघी मुली. या गावातल्या प्राथमिक शाळेत होत्या तेव्हा लेक लाडकी अभियानाचे काम त्यांच्या गावात सुरु झाले. त्या दोघी वर्गात हुशार आणि अनेक गोष्टींमध्ये रस घेणाऱ्या. त्यामुळे अभियानाच्या पथनाट्य, गाणी या उपक्रमांत त्या आघाडीवर असायच्या. गावात तेव्हा किशारींचे दोन गट तयार झाले. थोड्या मोठ्या मुलींचा सावित्रीबाई फुले गट आणि छोट्या मुलींचा अॅड.वर्षाताई देशपांडे गट. या दोघी छोट्या गटात होत्या.

गटात आल्यावर काही दिवसांनी त्यांच्या हातात 'ओळख स्वत:ची' हे पुस्तक पडलं. भरपूर रंगीत चित्रं, आकाराने मोठं, मोठ्या अक्षरांत असलेलं ते



पुस्तक मुलींना भलतंच आवडलं. त्यातली भाषाही साधी, सोपी होती. आणि विषय तर जिव्हाळ्याचा होता. आपलं शरीर नेमकं काय आहे, वयात येताना त्यात काय बदल होतात, हे अगदी सोप्या भाषेत सांगितलं होतं. हे पुस्तक शाळेतल्या पुस्तकापेक्षा वेगळं होतं. आजपर्यंत इतक्या सहज आणि सोप्या शास्त्रीय भाषेत मुलींशी घरात, शाळेत कोणीही बोललेल नव्हतं. या पुस्तकातून मुलींना स्वत: विषयी कळलं. स्वत:च्या शरीरातील बदलांविषयी कळलं आणि म्हणून ते आवडलंही. हा विषय एकदम अस्पर्श असल्यासारखा. त्यामुळे त्यावर कोणी बोलत नाही. मैत्रिणी ही कुजबुजत बोलतात आणि घरात कधीतरी आई बोलते तेही त्रोटक. त्यामुळे मुलींची या पुस्तकाशी छान मैत्री झाली. बडेवाडीवरुन मुलींना शाळेसाठी मानूरला जावं

लागतं. त्यांच्याच एका वर्गमैत्रिणीला क्लासला जाताना एका टपोरी मुलाने छेडलं. जबरदस्तीने चिठ्ठी देण्याचा प्रयत्न केला. तिच्या आई, वडिलांनी पोलिसांत तक्रार केली. अशा घटना आजूबाजूला बऱ्याचदा घडतात. आई, वडिल ऊसतोडीला जातात. तेव्हाही भीती वाटायची ती अशाच प्रकारांमुळे पण आत गटात आल्यापासून 'ओळख स्वत:ची' वाचल्यापासून हे प्रकार सहन करायचे नाहीत, उलट त्याविरोधात आवाज उठवायचा, हे मुलींना नीट ध्यानात आलं आहे. या दोघींच्या वर्गात मुले आहेत. पण त्यांच्याशी अभ्यास सोडला तर फार बोलणे होत नाही. खरं तर मुलांशी मैत्री करायला त्यांना आवडेल, पण गावात लोक वेगळ्या चर्चा करतात, त्यामुळे असा संवाद अद्याप तरी होत नाही. पण तो



व्हायला हवा, असं मुलींना वाटतं. पुस्तकामुळे वाढत्या वयात काय खायला हवं आणि काय टाळायला हवं ते कळलं. आधी पालेभाज्या अजिबात आवडायच्या नाहीत. पण आत या भाज्यांचं महत्त्व कळलंय त्यामुळे त्या तक्रार न करता खाल्ल्या जातात. दुपारी शाळेत खिचडी भात मिळतो. तोही आवडतो. प्रज्ञा, सारिकाचे आई, वडील ऊसतोडीला जात नाहीत पण त्यांच्या अनेक मैत्रिणीचे आई-वडिल जातात. काही मुलींची आजी असते घरी. मात्र काही मुली स्वत: स्वयंपाक करतात. जसं आणि जे जमेल ते करतात आणि खातात. चांगलं, वाईट किंवा पोषक अशी निवड त्यांना नाही करता येत. प्रज्ञाला भाजी, भाकरी करता येते. संध्याकाळी सगळ्यांसाठी आठ नऊ भाकरी तीच करते !

प्रज्ञा, सारिका संध्याकाळी शाळेतून आल्या की घर झाडून स्वच्छ करतात. गोठ्याची साफसफाई करतात. पाणी भरतात, स्वयंपाकात मदत आणि नंतर अभ्यास. त्यांच्या वयाच्या सगळ्याच मुली अशी कामे करतात. वयात येताना मुलींनी घरातली सगळी कामे आलीच पाहिजेत, हे गृहीत धरलेले असते. या मुलींच्या वयाचे त्यांच्याहून मोठे भाऊ घरात असतात. ते मात्र कामाला हात लावत नाहीत. शाळेतून आले की दप्तर टाकून बाहेर खेळायला नाहीतर मित्रांसोबत मस्ती करायला बाहेर धावतात. त्यांना घरात कोणी काही काम सांगत नाही. एकाच वयाच्या भावंडांध्ये असा भेदभाव का, असा प्रश्न मुलींना पडतो. त्यांच्या वर्गात सोनाली नावाची मुलगी होती.

त्यांच्याच वयाची. त्यांच्या गटात होती. आई वडिलांची ऐपत नव्हती. म्हणून तिच्या खासगी शिकवणीची फी 'अभियाना' च्या माध्यमातून भरती होती. शाळेत जाता यावं म्हणून सायकल दिली होती. या उन्हाळ्यात आई-वडिलांनी तिचं लग्न लावून दिलं. लग्न होणार हे कानोकानी कळलं होतं, पण कुठे, कधी काहीच माहिती नव्हतं. नेमक्या त्या काळात आशा सेविका गावात नव्हत्या. तिचे आई-वडील गुपचुप दुसऱ्या गावात लग्न उरकून आले. पूजा नावाच्या दुसऱ्या मुलीबाबतही असाच प्रकार घडला. तिचे तर लग्न आहे, अशी खबरही लागली नव्हती. अचानक बातमी आली ती थेट लग्न झाल्याची. एवढ्याशा बडेवाडी गावात कुणाला खबरही न लागू देता ही दोन लग्न झाली. याचं मुलींना वाईट वाटतं आणि रागही येतो. त्यातल्या त्यात समाधान एवढंच की यापैकी सोनाली लग्न होऊनही शाळेत येते. प्रज्ञा, सारिका मात्र स्वत:चं शिक्षण पूर्ण होऊन कमावत्या झाल्याशिवाय लग्नाचा विचार करणार नाहीत. प्रज्ञाला डॉक्टर व्हायचं आहे. त्यासाठी प्रवेश परीक्षा, त्याची तयारी अशी सगळी माहिती तिने करुन घेतली आहे. ती त्यासाठी भरपूर अभ्यासही करते. गावात कितीतरी लोक पैसे नसल्याने योग्य उपचार घेऊ शकत नाहीत. त्यांच्यासाठी आरोग्य सुविधा द्यायचं तिचं स्वप्न आहे. सारिकाला वकिलीचं शिक्षण घेऊन पुढे न्यायाधीश व्हायचं आहे.

अन्यायग्रस्त, बायका, मुलींना न्याय द्यायचा आहे. बलात्कार, बालविवाह, बायकोला मारहाण करणारे या प्रकारांना जबाबदार असणाऱ्यांना कडक शिक्षा व्हायला पाहिजे असं तिला वाटतं. अभियानाच्यावतीने बडेवडीतून रोज मानूरला शाळेत जाणाऱ्या १२ मुलींना सायकली देण्यात आल्या. 'लेक लाडकी अभियाना' ने वेगवेगळ्या संस्था आणि व्यक्तिंना विनंती करुन मुलींसाठी या सायकली दिल्या आहेत. सारिका आणि प्रज्ञालाही सायकल मिळाली. या सायकलीमुळे हा पाच किलोमीटर माळरानावरचा प्रवास सुसहय झाला आहे. मुली त्यांच्या शिकवणीसाठी पहाटे लवकर बाहेर पडतात ते थेट संध्याकाळी उशिरा परत येतात. एरवी दीड तासांची पायपीट आता सायकलमुळे २० मिनिटांवर आली आहे. वेळ वाचतो आणि व्यायामही होतो म्हणून मुली खुश आहेत. मुलींचं शिक्षणाचं स्वप्न आता सायकलीच्या चाकांवर वेगाने धावू लागलंय.

# स्व कमाईचं सुख

स्वाती भागवत साबळे

शिकण्याची प्रचंड इच्छा असलेल्या स्वातीला घरात सुरु असलेल्या तिच्या लग्नाच्या चर्चा टाळून पुढे शिकायची संधी मिळाली आणि तिने त्या संधीचं सोनं केलं. आई-वडिलांनाही आता तिचा अभिमान वाटतो.

शिरुर तालुक्यातलं लोणी स्वातीचं गाव. घरी सहा एकर शेती आहे. आहे आणि वडील शेती करतात. दोन मोठे भाऊ कमावते आहेत. गावात दहावीपर्यंत शाळा आहे. दहावीपर्यंत शाळेत जायला कुणाची ना नसते. पण त्यानंतर शिकायचं तर शिरुरला जायला लागतं. तेही गावापसून मुख्य रस्त्यापर्यंत तीन किलोमीटर चालत जायचं. तिथून शिरुरची बस पकडायची. वाट रानातून, झाडाझुडपातून जाते. सोबतीशिवाय या वाटेनं एकटीने जाणं म्हणजे संकटाला आमंत्रण.

त्यामुळे कुधी मुलींना दहावीनंतर पुढे शिकवायचा विचारच करीत नसे. स्वातीला शिकायची इच्छा होती. आई सकाळी उठून शेतात जायची. घरातलं काम तिच्यावर पडायचं. हंगामात शेतीसाठी मदत करावी लागायची. त्यातून



वेळ मिळेल तशी शाळा आणि अभ्यास. दहावी पूर्ण होईपर्यंत कुणी काही म्हटलं नाही. पण स्वातीला पुढे शिकवायची घरात अजिबात तयारी नव्हती. तिला किमान टायपिंग शिकयचं होतं. जमल्यास एमएसआयटीचा कोर्सही पूर्ण करायची इच्छा होती. एक दिवस तिने घाबरतच वडिलांसमोर प्रस्ताव मांडला. म्हटलं,‘ मी पहाटे घराबाहेर पडून हे दोन्ही कोर्स पूर्ण करेन. दहा वाजता घरी येईन. घरातल्या कामांवर याचा काही परिणाम होऊ देणार नाही.’ वडील नाही म्हणाले नाहीत. सुदैवाने सोबत गावतल्याच काही मैत्रिणी होत्या. पहाटे पाचला उठून एकमेकींच्या सोबतीने चालत मुख्य रस्त्यावर येऊन बस पकडत त्या शिरुर गाठायच्या. सगळ्यांनी अकरावीला प्रवेश घेतला होता. पण कुणी

कॉलेजला जात नव्हतं. रोजच्या प्रवासात गप्पा व्हायच्या. कोर्स पूर्ण झाले की घरातले लोक शिकू देतील का, नाही दिलं तर घरी बसायचं का, लग्न करुन दिलं तर आपण काय करणार...' एकमेकींशी बोलून थोडी चिंता थोडी कमी व्हायची. सकाळी सात ते दहा कोर्स असायचे. तिथून परत आल्यावर जेवण केलं की शेतात. संध्याकाळपर्यंत काम करुन नंतर घरी. थकायला व्हायचं. पण पर्याय नव्हता. त्यातच स्वातीने अकरावीची परीक्षा दिली. त्यात पास ही झाली. पुढचं वर्ष बारावीचं होतं. अधून मधून कधीतरी कॉलेजला जावून तेही वर्ष निघालं. बारावी पास झाल्याच्या आनंदापेक्षा आता पुढे काय, हा ताण मोठा होता. लग्नासाठी स्वातीची अजिबात तयार नव्हती. पण हे घरात पटवून देणं अशक्य होतं. स्वातीला काय करावं कळेना. वडील घरात लग्नाची चर्चा करुन लागले होते. नेमक्या त्याच वेळी वर्षाताई शिरुरला आल्या होत्या.

स्वातीला मैत्रिणीने त्यांच्याविषयी सांगितलं. मुलींनी त्यांना भेटायचं ठरवलं. त्यावेळी वर्षाताई मुलींसाठी खूप कोर्सेस घेऊन आल्या होत्या. घरी खोटंच सांगून मुली शिरुरला पोहोचल्या. तिथे त्या दिवशी प्रवेश परीक्षा होती. वैद्यकीय सहायक, टायपिंग, ब्युटी पार्लर, ड्रायव्हिंग अशा वेगवेगळ्या कोर्सेसमध्ये रस असलेल्या मुली ती परीक्षा द्यायला आल्या होत्या.

अख्खा वर्ग भरला होता. स्वातीनेही परीक्षा दिली. ती उत्तीर्ण झाली आणि तिनं वैद्यकीय सहायकाचा कोर्स निवडला. आता परीक्षा मोठी होती ती घरात सांगण्याची वडिलांपेक्षा आईला समजावणे सोपे होते. तिला सांगितलं. आईने वडिलांना पटवून दिले आणि ते तयार झालेही. साताऱ्याला जायचा दिवस उजाडला. स्वाती आतापर्यंत घर सोडून बाहेर कधीच राहिली नव्हती. साताऱ्यात आल्यावर अनेक दिवस घराची आठवण यायची. रडू यायचं. पण वर्षाताई मुलींना समजावून सांगायच्या. मुलींचं मन रमावं म्हणून त्या त्यांना सहलीला घेऊन गेल्या. व्यवहारज्ञान यावं म्हणून बँकेची कामं शिकवली. कोर्टाचं काम कसं चालंत ते दाखवलं.

अखेर कोर्स सुरु झाला. सगळ्याच मुली बारावी पास झालेल्या. पण प्रत्यक्षात ज्ञान म्हणला तर काही नव्हतं. मुली रडकुंडी येत होत्या. एक तर बऱ्याच संकल्पना इंग्रजीतून होत्या आणि सगळ्यांचा त्या विषयाचा पायाच कच्चा होता. शिकवलेलं बरंच डोक्यावरुन जात होतं आणि अगदी थोडं कळत होतं. तशाच  प्रात्यक्षिकं सुरु झाली. स्वाती आणि इतर मुली सातारा सिव्हील हॉस्पिटलला जायच्या हा अनुभव मात्र त्यांना आवडू लागला. आधी कोणत्याच गोष्टी मुलींच्या हातात सोपवण्याच्या तिथल्या सिस्टर मंडळींची, सिनिअरची तयारी नव्हती. कारण मुली खूप अननुभवी होत्या. मुलींनी त्यांचा

विश्वास संपादन केल्यावर मात्र त्यांनी अनेक गोष्टी शिकवल्या. मुलीही निरीक्षणातून शिकत होत्या.

स्वातीने पेशंटला पहिल्यांदा सलाईन लावलं तेव्हा तिचे हात अक्षरश: थरथरत होते. पण नंतर एका सिनिअरचं लक्ष देऊन निरीक्षण केलं. तंत्र लक्षात आलं आणि थोड्या सरावाने ती ते सहज लावू शकती. इंजेक्शन देणं, रक्तदाब मोजणं, ड्रेसिंग करणं सहज जमू लागलं. समजलं नाही तर तिथल्या सरांना, सिनिअरना विचारण्याइतकं धाडस आलं. कोर्स संपला. लगेचच साताऱ्यात आदित्य हॉस्पिटलमध्ये नोकरी मिळाली. स्वकमाईचे पैसे हातात आले तेव्हा अभिमान दाटून आला.

नोकरी लागल्यावर स्वाती घरी गेली तेव्हा आईला छानशी साडी घेतली. वडिलांना कपडे घेतले. दोन्ही भावांना त्यांच्या आवडीचे रंगाचे ड्रेस घेतले. सगळ्यांच्या चेहऱ्यांवर आनंद ओसंडून वाहत होता. उरलेले दहा हजार रुपये वडिलांच्या हातात दिले. त्याच्या डोळ्यांत पाणी आले. म्हणाले ‘ बघ माझी लेक...’ त्या दोघांच्या डोळ्यांत न बोलता खूप काही होतं... ते स्वातीला वाचता आले. आता घरातले लोक लग्नाचा विषय काढत नाहीत. स्वातीचा वडील म्हणतात, ‘ कर नोकरी. मनापासून काम कर, प्रॅक्टिस कर, म्हणजे आणखी परिपूर्ण होशील.’ स्वाती एकीकडे पदवीचे पेपर देते आहे. पदवी पूर्ण झाली की तिचा पुढे ‘जीएनएम’ करायचा विचार आहे. लग्न तर इतक्यात नाहीच.....

# आत्मनिर्भरतेचे सुकाणू

स्वाती व्हरकटे

गाडी चालवणं ही फक्त पुरुषांची मक्तेदारी, असा समज असलेल्या गावात राहून तिने ड्रायव्हिंगचे धडे गिरवले, यशस्वीपणे प्रशिक्षण पूर्ण करुन चारचाकी वाहन चालवण्याचा परवानाही मिळवला. आता तिचं स्वप्न आहे स्वत:ची गाडी घेण्याचं !

दोन वर्षापूर्वी उन्हाळ्याच्या सुट्टीत गावातल्या आशा ताईंनी वर्षा देशपांडे आणि त्यांच्या लेक लाडकी अभियानाविषयी सांगितलं. त्यानंतर अभियानाचं एक पथनाट्य स्वातीला करायला मिळालं. 'लहान मुलीला नवरी एका समजू' हे त्या पथनाट्याचं नाव. मुलीचा बालविवाह करु नका, तिला शिकवा, स्वत:च्या पायावर उभी करा. असा संदेश देणारं हे पथनाट्य स्वाती आणि तिच्या अहिल्याबाई होळकर गटाने अनेक ठिकाणी केलं. औरंगाबादमध्येही त्याचा प्रयोग झाला. वृतवाहिन्यांनी त्याची दखल घेतली. हे समाजप्रबोधन करताना गेल्या उन्हाळ्यात अभियानाने मुलींसाठी वेगवेगळे कोर्सेस आणले. त्यातला ड्रायव्हिंगचा कोर्स स्वातीला आवडला. कोर्स दोन महिन्यांचा होता



आणि शाळेला सुट्टी होती. तिने रोज तासभर मनापासून वेळ दिला. एरव्ही तिने असं काही शिकायचा विचारही केला नसता. एकतर तिच्या गावात ड्रायव्हिंग ही पुरुषांची मक्तेदारी समजली जाते आणि दुसरे म्हणजे कोर्ससाठी लागणारी फी ! घरची परिस्थिती जेमतेम असल्याने एवढे पैसे उभे करणे अवघड होते. पण ' लेक लाडकी अभियाना' मुळे ही वेगळी संधी मिळाली. क्लासचा पहिला दिवस स्वातीला चांगला आठवतो. पहिल्यांदाच ती ड्रायव्हिंग सीटवर बसली होती. ब्रेक, ॲक्सलरेअर यांचा गोंधळ होत होता. क्लच दाबायला विसरायला व्हायचं. ड्रायव्हिंग व्हील कुठेही वळायचं. पण शिकवणाऱ्या काकांनी आत्मविश्वास दिला आणि स्वाती चारच दिवसात सराईतपणे गाडी चालवू लागली. महिनाभरात तर ती चांगली तरबेज झाली. तिच्याकडे आता चारचाकी गाडी चालवण्याचा

परवाना आहे ! तिच्यासोबत ४५ मुली होत्या. सगळ्यांनी हा कोर्स यशस्वीपणे पूर्ण केला. स्वाती दहावीत आहे. तिला पुढे विज्ञान शाखेत प्रवेश घ्यायचा आहे. आई-वडिलांची पाच एकर शेती आहे. त्यात कुटुंबाचं भागवणे कठीण होतं. म्हणून ते ऊसतोडीला जातात. मोठा भाऊही त्यांच्यासोबत जातो. स्वाती व तिची छोटी बहीण घरी असतात. स्वाती पाचवीत होती तेव्हापासून ती आणि तिची छोटी बहीण यांना आई - वडील गावात सोडून ऊसतोडीला जातात. तेव्हापासून स्वातीच सगळं घर सांभाळते. स्वातीच्या छोट्या वाडीत सध्या तब्बल ४० तरुण मुलं लग्नाची आहेत. त्यांच्या धनगर समाजात मुलींची संख्या इतकी कमी झाली आहे की लग्नाला मुली मिळेनाशा झाल्या आहेत. मुलींना हुंडा देण्याची वेळ आली आहे. यातून मुली वाचवायला हव्यात याचा धडाच समाजाला मिळाल्याचं ती सांगते आणखी थोडी मोठी झाल्यावर कदाचित दोनेक वर्षांनी ती स्वत:च्या गाडीचा विचार करेल. त्यासाठी सरकारी योजनेतून कर्ज मिळाले तर त्यासाठी प्रयत्न करायचा आहे. मुलांना शाळेत सोडण्यासाठी वाहन हवे असते, असा काही व्यवसाय करता येईल का, हाही विचार ती करते आहे. सध्या तरी ड्रायव्हिंगचे कौशल्य मिळवून आयुष्याचे सुकाणू आपल्या हाती आल्याचे समाधान तिच्या मनात आहे आणि मनाशी आत्मनिर्भर होण्याची स्वप्ने !

# फोटोशॉपची जादू

भाग्यश्री भिलारे

संगणकाची जादू तिने अनुभवली आहे. सर्वोत्तम गुण मिळवून तिनं संगणक प्रशिक्षण पूर्ण केलं आहे. आता यात अधिक शिक्षण घेऊन स्वत:चा व्यवसाय सुरु करण्याचं मोठं स्वप्न ती बघतेय.

सिंदफणा किशोरी मेळावा शिरुरला झाला तेव्हा भाग्यश्री पहिल्यांदा 'लेक लाडकी अभियाना' च्या संपर्कात आली. ते तिचं दहावीचं वर्ष होतं. पण काही तरी वेगळे अनुभवायला मिळणार म्हणून मैत्रिणीसोबत तीही या मेळाव्याला उपस्थित राहिली होती. तालुक्यात बालविवाह होतात, हे माहित होतं. पण ते थांबवण्यासाठी कुणीतरी प्रयत्न करतंय, हे तिला खूप दिलासा देणारे होतं. मुलींना स्वावलंबी करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम आणले जात आहेत आणि तेही विनाशुल्क हे समजल्यावर भाग्यश्री आणि तिच्या मैत्रिणीमध्ये उत्साहाची लाटच आली. यातले आपापल्या आवडीचे कोर्सेस निवडायचे हे सगळ्यांनी ठरवलं. तेव्हा भाग्यश्रीने फोटोशॉप निवडलं. दरम्यानच्या काळात गावातल्या अशा सेविका या मुलींना भेटल्या होत्या. त्यांनी मुलींना 'समता' आणि 'ओळख स्वत:ची' अशी दोन पुस्तकं वाचायला दिली. ही पुस्तकं खूप वेगळा विचार करणारी आणि करायला लावणारी होती.



असं काही भाग्यश्री प्रथमच वाचत होती. गावात बैठका व्हायला लागल्या. आजवर घरात मोठ्या माणसांसमोर तोंड न उघडणाऱ्या मुली मंचावर येऊन धीटपणे बोलू लागल्या. मुलींमध्ये आत्मविश्वास येऊ लागला. मुलींनी गावात राष्ट्रमाता जिजाऊ गट तयार केला. दहावीची परीक्षा संपली आणि अकरावीच्या वर्षात नोव्हेंबरमध्ये कोर्स सुरु झाला. अमोल ढाकणे सर हा कोर्स घ्यायचे. सुदैवाने घरातून भाग्यश्रीला खूप पाठिंबा आहे. कॉलेज आणि कोर्ससाठी रोज गावाहून येण्यापेक्षा शिरुरमध्येच राहणं अधिक सोपं जाणार

होतं. शिरुरमध्ये भाग्यश्रीची आजी राहते. थोडे दिवसांसाठी तिने आपला मुक्काम शिरुरला हलवला. भाग्यश्रीचे वडील सामाजिक कार्यकर्ते आहेत. मुलींना शिकवण्याचं, स्वावलंबी करण्याचं महत्त्व ते जाणतात. त्यांनी तिला पूर्ण पाठिंबा दिला. त्यामुळे ती निर्धास्तपणे शिकू शकते. आता ती बारावीला आहे. चार दिवस कॉलेज बुडवून ती मुंबईला 'युएनएफपीए' च्या कार्यक्रमाला येऊ शकली कारण अभ्यासाइतकाच हा उपक्रमही महत्त्वाचा आहे, हे तिला पटलंय. भाग्यश्रीचा फोटोशॉप कोर्स तीन महिन्यांचा होता. शाळेत कंम्प्युटर कसा सुरु करायचा इथपासून सुरुवात होती. तिच्या सोबतच्या सगळ्या मुलींचा हाच प्रश्न होता. ढाकणे सरांनी अगदी बेसिकपासून सुरुवात केली. सरांना आधी या मुलींना तीन महिन्यांत फोटाशॉप कसे शिकवणार, ही काळजी होती. पण मुलींनी जोमाने कष्ट केले. भरपूर सराव केला. ढाकणे सरांनी सगळ्यांचा आत्मविश्वास वाढवला. आपण हे सहज करु शकू. असं मुलींना वाटू लागलं. बारा मुली होत्या. प्रत्येकीला स्वतंत्र कम्प्युटर होता. दोन तास मुली कसून सराव करायच्या. पुष्कळदा विजेची समस्या असायची. भारनियम असायचे. पण मुलींनी जिद्दीने कोर्स पूर्ण केला. फोटोंचा कटआऊट काढणं आणि त्याच्या कडा एकदम शार्प असणं ही फोटो शॉपमधील कला मानली जाते. सर हे काम पुन्हा पुन्हा करायला लावायचे. कधी कंटाळा येऊन ते कधी सोडूनही द्यावसं वाटायचं. पण दुसरीकडे वर्षाताईंनी ज्या कारणासाठी हा कोर्स सुरु केला, त्याचही जाणीव सर करुन द्यायचे. मग मुलींना पुन्हा हुरुप यायचा. अखेर परीक्षा झाली. सगळ्या मुलींना ए ग्रेंड मिळाली. भाग्यश्री चक्क ए-वन ग्रेंड मिळवून पहिली आली. भाग्यश्रीला 'नीट' परीक्षा देऊन मेडिकल क्षेत्रात जायचे आहे. दुसरीकडे फोटोशॉपचेही करिअर तिला खुणावते आहे. फिल्म आणि टेलिव्हिजन एडिटिंगच्या क्षेत्रात काही करायला मिळाले तर तिला ते आवडेल. मुली वाचवण्यसाठी या ज्ञानाचा उपयोग करण्याचं तिचं स्वप्न आहे.

# स्वावलंबनातलं सौंदर्य

माधुरी चिपाड

तिने ब्युटी पार्लरच्या कोर्ससोबत व्यक्तिमत्व घडेहि गिरवले. तिचं पदवीपर्यंतचं शिक्षण अद्याप पूर्ण व्हायचं आहे. पण त्याआधीच तिनं स्वत:च्या पायावर उभी राहण्याची क्षमता आणि त्याहून मोठा आत्मविश्वास कमावला आहे.

माधुरीच्या आई जयश्री चिपाडे बचत गटांचे काम करतात. कालांतराने त्या लेक लाडकी अभियानाशी जोडल्या गेल्या. आईचं काम बघून हिवरशिंगा गावात माधुरीनेही सावित्रीबाई फुले गटाच्या माध्यमातून काम सुरु केलं. तेव्हा ती दहावीत होती. दहावीच्या सुट्टीच्या काळात हाताशी भरपूर वेळ होता आणि लेक लाडकी अभियानाने शिरुरमध्ये काही कोर्सेस सुरु केले होते. त्यात ब्युटी पार्लरचा कोर्स होता. गावात मुलींनी काही व्यवसाय सुरु केला तर त्या सर्वांचा प्रतिसाद मिळेल असा हा व्यवसाय होता आणि माधुरीलाही त्याची आवड होती. रोज हिवरशिंगा इथून निघून १० वाचता शिरुरला पोहोचायचं.



वेगवेगळ्या गावांतून ३५ मुली या कोर्ससाठी यायच्या. प्रिया चव्हाण या साताऱ्याहून आलेल्या ब्युटीशियन हा कोर्स घ्यायच्या. मुलींनी पार्लर फक्त पाहिलं होतं. कुणी अधूनमधून गेलंही होतं. पण प्रत्यक्ष त्या गोष्टी करुन कधीच पाहिल्या नव्हत्या. पण सगळ्यांनाच त्याची प्रचंड आवड होती. त्यामुळे मुली मनापासून शिकल्या. थ्रेडिंग, वॅक्सिंग, फेशिअल, हेअर कट, मॅनिक्युअर, पेडिक्युअर अशा गोष्टी मुली सहज करु लागल्या. तीन महिन्यांच्या कोर्समध्ये अगदी तरबेज झाल्या माधुरी तर आता स्वतंत्रपणे लग्नाचे मेकअप करते. या कोर्स मध्ये केवळ बाह्य सौंदर्यच नव्हे तर आहार, पोषण याबद्दलही मुलींना शिकवलं गेलं. या शिवाय बाहेर बोलावे, वागावे कसे, संवाद कसा साधावा अशा व्यवहारात उपयोगी पडणाऱ्या व्यक्तिमत्व विकासाच्या गोष्टीही मुली शिकल्या. आता माधुरी बारावीत आहे. पुढे शिकून ती पार्लर सुरु करण्याचा विचार गंभीरपणे करतेय.

घरात हवं ते करण्याचं स्वातंत्र्य आहे, त्यामुळे ती दोनेक वर्षात याबद्दल विचार करेल. त्याआधी या क्षेत्रातील आणखी प्रशिक्षण घेण्याची तिची इच्छा आहे. माधुरीच्या बॅचमधल्या आणि आधीच्या बॅचमधल्या अनेक मुली घरातच छोटे पार्लर चालवतात किंवा काहीजणी मागणीनुसार सेवा देतात. दुसरीकडे शिकवतातही. कॉलेजच्या फीपुरते पैसे त्यातून सहज मिळतात. या भागात अनेक कुटुंबात अजुनही मुलींना लग्नानंतर नोकरी करु दिली जात नाही. पार्लरसारख्या व्यवसायातून घरबसल्या चांगले पैसे मिळतात, हे मुलींनी अनुभवलं आहे, त्यामुळे हा कोर्स चांगलाच लोकप्रिय झाला. अभियानामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास आला, असं माधुरी सांगते. त्यापूर्वी तालुक्यातील परिस्थिती भयंकर होती. बालविवाहांविरोधात पुढे येऊन बोलण्याचे धाडस मुलींमध्ये आलं. माधुरीच्या आईचा बालविवाह होता. त्याची अनेक पातळ्यांवर किंमत मोजावी लागते हे त्यांनी अनुभवले आहे. त्यामुळे मुलींची लग्न १८ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय करायची नाहीत, हे त्यांनी ठरवून टाकलंय. माधुरीच्या मोठ्या बहिणींची लग्नंही त्या सज्ञान झाल्यावरच झाली. पदवीधर झाल्यावर स्वत:चा व्यवसाय सुरु करावा किंवा याच क्षेत्रात अधिक प्रशिक्षण घेऊन मनोरंजन क्षेत्रात जावे, असा विचार ती करते. मात्र, मुलींच्या बाह्य सौंदर्यापेक्षा आत्मविश्वास आणि स्वावलंबन यांतून येणारं सौंदर्य अधिक खुलून दिसतं. असं सांगायला माधुरी विसरत नाही.

# लढवय्यी

ऋतुजा जगदाळे

मुळातच लढाऊ बाण्याच्या ऋतुजाला नेतृत्वाची संधी मिळाली आणि 'लेक लाडकी अभियाना' च्या माध्यमातून तिच्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या गावातील महिलांना तिने लढायला शिकवलं.

ऋतुजा सतत बोलत राहते. तिला नेहमी काही तरी सांगायचं असतं. आपलं म्हणणं खुलवून सांगण्याची, घटनेतले बारकावे टिपण्याची विलक्षण हातोटी तिच्याकडे आहे. ती शिरुरच्या कालिकादेवी महाविद्यालयात बारावीत शिकते. तिचं गाव कोळवाडी, शिरुरपासून काही अंतरावरच आहे. ती नववीत असताना 'लेक लाडकी अभियाना'च्या प्रकल्पामधून किशोरी गटात आली. दहावीची परीक्षा संपली आणि तिला इतर मुलींसोबत साताऱ्यात किशोरींच्या शिबिरासाठी जाता आलं. पहिल्यांदात ऋतुजा एका छान मुक्त वातावरणात आली होती. या शिबिरात मुलींना त्यांच्या हक्कांविषयी प्रथमच कळालं. मुली न्यायालयात गेल्या, बॅंकेचं काम पाहायला गेल्या, बचत गट फेडरेशनचं काम कसं चालतं हे त्यांनी पाहिलं. सहलीला गेल्या. भरपूर धमाल केली. ऋतुजा तिथून परत आली ती एक नवी ऊर्जा घेऊन. गावातल्या किशोरींनी एकत्र येऊन केलेला गट होताच. अनेक वाईट प्रथांच्या विरोधात त्यांना लढायचं होतं. म्हणून गटला नावं दिलं राणी लक्ष्मीबाई गट. दरम्यान, गटाची प्रमुख असलेली मुलगी गाव सोडून पुढच्या शिक्षणासाठी परगावी गेली आणि ऋतुजा गटाची प्रमुख झाली.

ऋतुजाचे वडील दारु प्यायचे. वाढत्या वयातल्या ऋतुजाला हे अजिबात आवडायचं नाही. गावात तिच्या वडिलांसारखे आणखीही दारु पिणारे लोक



होते. दारु पिऊन घरात बायकांना, मुलांना होणारी मारहाण रोजचीच होती. गावातल्या दारुच्या दुकानातून त्यांची ही गरज भागवली जायची. याविरोधात ऋतुजा घरात, बाहेर बोलू लागली. पण काही उपयोग होत नव्हता. कुणी तरी सांगितलं की

गावातल्या महिलांनी ठरवलं तर दारुची दुकानं बंद होऊ शकतात. ही एवढीशी शाळकरी मुलगी पण मोठी जिद्दी. महिलांच्या ग्रामसभेत हा विषय काढायाचा असं तिनं ठरवलं. ग्रामसभा ठरली होती सकाळच्या वेळात पण शेतात कामावर जाणाऱ्या सगळ्यांना सोयीचं व्हावं म्हणून तिनं ही सभा संध्याकाळी घ्यायचं ठरवलं. तसा गावात प्रचारही केला. परस्पर वेळ बदलल्यामुळे ग्रामसेवकासह सगळेच तिच्यावर चिडले. पण तिला उपस्थितीची खात्री होती. साडेतीनशे लोक बसू शकतील एवढं सभागृह खचाखच भरलं होतं. किर्तनाशिवाय पहिल्यांदाच एखाद्या वेगळ्या कार्यक्रमाला महिला एवढ्या मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. ऋतुजाने दारुचा मुद्दा काढला तेव्हा तिच्यावर सगळेच संतापले. ‘तू धड १६ वर्षांचीही नाहीस. इतर गोष्टींकडे लक्ष द्या. अंगणवाडीत मुलांना पोषण आहार मिळतो का बघा, गावातले शिक्षणाचे काही प्रश्न असतील तर तिकडे लक्ष द्या. सुरुवातीला इतक्या मोठ्या विषयाला कशाला हात घालता ? एकदम सगळेच अंगावर आले. ऋतुजासह सगळ्या बायका गप्प बसल्या, पण तेवढ्यापुरत्या. नंतर त्यांनी ऋतुजाच्या घरी तिचे वडील नसताना मीटिंग घेतली. गावातले दोन तरुण त्यांना मदत करायला तयार झाले. त्यांनी या बायकांना दारुबंदीचा अर्ज लिहायला मदत केली. मीटिंगला हजर असलेल्या बांयकांची संख्या होती १५. घरातले काय म्हणतील, नवरा मारझोड करेल अशा काळजीमधून प्रत्यक्षात पोलिस अधीक्षकांच्या कार्यालयात पोहोचल्या फक्त सहाजणी. हेही कमी नव्हतं. अधीक्षकांनी पोलीस ठाण्यात फोन केले. या बायका गावात पोहोचण्यापूर्वीच दारुचे दुकान बंद झाले होते. पण हे फार दिवस टिकले नाही. काही दिवसांत ते पुन्हा सुरु झाले. बायकांनी अधिक्षकांना पुन्हा फोन केले. पुन्हा दुकान बंद झाले. एकदा तर त्या दुकानावर पोलिसांनी छापाही टाकला. पण त्याआधीच दुकानातील दारु दुसरीकडे लपवली गेली होती. पकडून नेलेले लोकही सुटले. यानंतर ऋतुजाला घरातल्या लोकांनी तर सुनावलेच पण आजूबाजूचे लोकही बालू लागले. नसते उद्योग बंद कर, म्हणू लागले. त्यात गावातली दारु बंद करायला निघालेल्या महिलांना सहकार्य करणाऱ्या पोलिस अधीक्षकांची बदली झाली. आता नवे अधिकारी रुळायचे आहेत. दरम्यानच्या काळात गावातले दुकान पुन्हा सुरु झाले आहे. ऋतुजा पुन्हा एकदा दोन हात करायच्या तयारीत आहे. या सगळ्यांत आनंदाची गोष्ट म्हणजे तिच्या वडिलांची दारु सुटली. एकेकाळी फक्त ५५ किलो असलेले त्यांचे वजन आता व्यसन सुटल्यावर ७० किलोपर्यंत गेले आहे ! ऋतुजा सभाधीट आहे. ती पाचवीपासून वक्तृत्व स्पर्धेत भाग घेते. एकदा तर तिच्या भाषणाला दोन हजार

रुपयांचे बक्षीस मिळाले होते. आता लेक लाडकी अभियानात ती पथनाट्यातही सहभागी होते.


गावात बालविवाह होऊ नयेत म्हणून तिचा किशोरी गट सतत जागरुक असतो. तरीही एखादी घटना घडतेच. गेल्या वर्षी तिच्याच एका मैत्रिणीचे लग्न ठरले. कुणाला काही न कळवता ते गुपचूप होणार होते. तिला हे आदल्या दिवशी कळले तेव्हा ती शाळेत होती. तिच्याकडे फोन नव्हता. वर्षाताईंना कळवायचे तर फोन करायला हवा होता. शिक्षकांना विनंती केली तेव्हा त्यांचा संताप झाला. म्हणाले ' तुला कुणी सांगितला आगाऊपणा? वडिलांना सांगू का तुझ्या ? ती गप्प बसली. दुसऱ्या दिवशी मैत्रिणीचे लग्न झाले. नवरा मुलगा पंधरा वर्षांनी मोठा. सासरच्या लोकांनी मुलीच्या वडिलांना दोन लाख रुपये देऊन लग्न करुन घेतले होते. चारच महिन्यांत मोटारसायकलचा अपघात होऊन मुलगा गेला. मालमत्तेत सुनेने वाटा मागू नये म्हणून सासरच्या लोकांनी पुन्हा दोन लाख रुपये दिले आणि मुलीला माहेरी पाठवून दिले. नवरा जाऊन वर्ष होत नाही तोवर माहेरच्या लोकांनी पैसे खर्चही केले. वडील तिच्यावर आत पुन्हा लग्न करण्यासाठी दबाव आणताहेत. अशा वेळी काय करावं कळत नाही म्हणत ऋतुजा अस्वस्थ होते. पुन्हा अशी घटना गावात घडू नये म्हणून सजग राहायचं असे तिने मनोमन ठरवलं आहे. बारावी झाल्यावर वकील व्हायचं आणि मुलींसाठी, महिलांसाठी लढायचं, असं ऋतुजाने ठरवले आहे. खरं तर तिची ही लढाई आधीपासूनच सुरु झाली आहे.

# स्वच्छतेची दूत

योगिता गवळी

तिने शाळकरी मुलींना एकत्र करुन गावात पालकांच्या विरोधात मोर्चा काढला. मुलींची मागणी होती घरांत शौचालय बांधण्याची, मुलींनी पालकांनाच नव्हे तर सरकारी यंत्रणेलाही कामाला लावलं आणि प्रत्येक घरात शौचालय उभं राहिलं. आता ' लेक लाडकी अभियाना'च्या मदतीनं मुली शेजारच्या गावांतही हा स्वच्छतेचा प्रयोग राबवत आहेत.

गोमळवाडा हे शिरुरमधलं छोटंसं गाव. न्यू इंग्लिश स्कूल ही तिथली शाळा गावाच्या अगदी सुरुवातीलाच लागते. योगिता गवळी या शाळेत दहावीपर्यंत शिकली. आता ती बारावीत आहे. योगिता दहावीला होती तेव्हाची गोष्ट, देशात सगळीकडे स्वच्छतेचे वारे वाहू लागले होते पण गोमळवाडा गावाला त्याच्याशी काहीच घेणे देणे नव्हते. गावात एकही शौचालय नव्हते. लोक उघड्यावर शौचाला जायचे. तेही शाळेच्या बाहेर ! सगळा परिसर गलिच्छ झालेला असायचा. दिवसभर वर्गात इतकी दुर्गंधी की मुले डबा खाऊ शकत नसत. शाळेच्या मैदानावरही घाण केलेली असायची त्यामुळे खेळताही यायचं नाही. गावतले सगळेच मोठे लोक यात सामील होते. त्यामुळे कुणी कुणाला बोलयाचा प्रश्नच नव्हता. योगिता आणि तिच्या मैत्रिणींचा हे बघून रोज संताप व्हायचा. हे लोक असे का वागतात, म्हणून हात पाय आपटायच्या. पण यासाठी काय करायंच, हे मात्र कळत नव्हतं. त्याच काळात राज्यात वेगवेगळ्या समाजाचे मोर्चे निघत होते. त्यांचे मोठमोठाले फोटो वर्तमानपत्रात दिसत. टिव्हीवर दाखवले जात. त्यातून योगिताला एक कल्पना सुचली. आपणही एक मोर्चा काढायचा. मात्र तो शासनाच्या विरोधात नाही तर पालकांच्या विरोधात. घरात महागडे फोन, टिव्ही, गाड्या घेण्यासाठी पालक पैसे खर्च करतात. पण कुटूंबासाठी शौचालय बांधायची मात्र तयारी नसते. त्यामुळे पालकांना जागं करायचं आणि त्यातून शाळेचा परिसरही स्वच्छ होईल. अशी योगिताची कल्पना होती. योगिताने वडिलांना शौचालय बांधायची गळ घातली. त्यांनीही तयारी दाखवली आणि काम सुरु झालं. एकदा स्वत:च्या



घरात शौचालय बांधायला सुरुवात झाल्यावर या विषयावर बोलण्याचा नैतिक अधिकार आपल्याला मिळाला असं तिला वाटलं आणि तिने ही कल्पना वर्गातील मुलींना सांगितली. 'नसेल शौचालय ज्याच्या दारी, देऊ नका मुलगी त्याच्या घरी', 'एकच चर्चा स्वच्छतेचा मोर्चा,''उघड्यावर शौचाने होत काय, पसरते रोगराई, भरतात पाय', नको मोबाईल, नको फ्रीज, एक शौचालय बांधा ना प्लीज.' अशी घोषणा ऐकून रविवारी सकाळी घरात निवांत बसलेली मंडळी घराबाहेर आली. थोडे अंतर ठेवून मुलींच्या मागून चालू लागली. लोकांना कळेना, सात मुली नक्की कसला मोर्चा घेऊन निघाल्या आहेत ! पारावर बसलेले, चहा टपरीवर चहा पिणारे वळून वळून पाहू लागले. मुली शेवटी ग्रामपंचायतीच्या बाहेर आल्या. तिथे ग्रामसेवक, सरपंच आणि इतर सदस्य मंडळी बसलेली होती. मुलींचा आक्रमक रागरंग बघून एकेकजण गाडीला किक मारुन निघू लागला. पण मुलींच्या घोषणांचा वाढता आवाज बघून त्यांना थांबावे लागले. तेवढ्यात योगिताचे वडीलही तिथे आले. त्यांना एकून परिस्थितीचा अंदाज आला. ते म्हणाले. ' योगिताने मला यातले काहीही सांगितले नसले तरी मला याचा राग नाही. मुलींनी आपले डोळे उघडले आहेत. आपण कितीतरी अनावश्यक गोष्टींवर खर्च करतो. त्याऐवजी थोडा आणखी पैसा घालून शौचालय उभारु. शाळेचा परिसरही त्यातून आपोआप स्वच्छ होईल. आपण आपल्या मुलींना खंबीर पाठिंबा देऊ.' लोकांना पटलं. त्यांनी मुलींना पाठिंबा दर्शवला. मुली घरी गेल्या. पण तोवर या मोर्चाची बातमी सगळीकडे पसरली होती. दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात छापूनही आली. त्यावेळचे बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी नामेदव ननावरे यांनी ती वाचली. ननावरे स्वच्छ भारत अभियानात विशेष सक्रिय होते. त्याचा फोन आला, ' मी गावात उद्या सकाळी येतो.' मुली पुन्हा कामाला लागल्या. ही आणखी एक संधी चालून आली होती. ननावरे साहेबांचं स्वागत गावातल्या सगळ्यात घाणेरड्या ठिकाणी करायचं असं मुलींनी ठरवलं. ते आले. गाडीतून उतरताना पाय कुठे ठेवावा. अशी त्यांची अवस्था झाली. त्यांनी परिस्थितीची कल्पना आली. त्यांनी पाठीवर थाप देत मुर्लींचे कौतुक केलं. त्यांनी एक बैठकच घेतली आणि जाहीर केले. ' केवळ या मुलींमुळे आज मी इथे आलो आहे. यापुढे गावात शौचालय उभारण्यसाठी सगळी सरकारी यंत्रणा तुमच्या गावाच्या पाठीशी उभी असेल.' त्याच दिवशी २१ शौचालयाचं भूमिपूजन योगिता आणि तिच्या मैत्रिणींच्या हस्ते झालं. पण सगळाच प्रश्न सुटला नव्हता. गावात या गोष्टी न पटलेले अनेकजण होते. त्यांचं मत बदलायचं होतं. तोवर शाळेतल्या आणखीही

मैत्रिणी योगितासोबत आल्या. मुलींनी सकाळी प्रभातफेरी सुरु केली. घरासमोर जाऊन मुली घोषणा देत. त्या आल्या की बायका घरात जाऊन दार बंद करुन घ्यायच्या. मग मुलींनी वेगळी कल्पना लढवली दुसऱ्या दिवशी त्या हलगी घेऊन गेल्या. लोकांच्या दारात जाऊन जोरजोरात हलगी वाजवणं सुरु केलं. या आवाजाने बुजून दारात बंधलेली जनावरं गळ्यातलं दावं तोडून पळायची. अखेर याला कंटाळून लोकांनी शौचालयं बांधायची तयारी दाखवायला सुरुवात केली. एकापाठोपाठ एक शौचालय पूण होऊ लागलं. बायका आता स्वत: हून पेढं येऊ लागल्या. आता गोमळवाडा गावात ९९% घरात शौचालये आहेत. योगिताच्या या कामाची दखल घेऊन तिला बीड जिल्ह्याची स्वच्छतादूत म्हणून नेमलं गेलं. त्यानंतर जिल्हा राज्य पातळीवर अनेक पुरस्कार तिला मिळाले. ठिकठिकाणी सत्कार झाले. तिची भाषणं झाली. गावात १० ते १५ कुटूंबामध्ये अद्यापही शौचालय नाही, कारण काही लोकांच्या नव्या घराचे काम सुरु आहे. काही जण मळ्यातून गावात तर काही गावातून मळ्यात राहायला जाणार आहेत. येत्या काही महिन्यांत हे झाले की पूर्ण गावात १०० टक्के शौचालये होती. गावात शौचालये झाली तरी त्यांचा वापर करण्याची मानसिकता मात्र नव्हती त्यामुळे योगिता आणि मैत्रिणींनी नवे काम सुरु केले. सकाळी साडेचारला त्या उठायच्या आणि ज्या बाजूला लोक शौचाला जातात. तिकडे मॉर्निंग वॉकला जायच्या. शौचाला डबे घेऊन बाहेर पडलेले लोक मुलींना बघून पुन्हा माघारी जायचे. महिनाभर हा प्रयोग केल्यावर लोक शौचालयांचा वापर करुन लागले ! मुलींनी गावातल्या शौचालयांसोबत शाळेचे शौचालयही नव्याने बांधण्याचा आग्रह मुख्याध्यापकांकडे धरला. त्यांना तो मान्यही झाला आणि शाळेलाही नवे स्वच्छतागृह मिळाले. दरम्यानच्या काळात योगिता ‘लेक लाडकी अभियाना’च्या कामाशी जोडली गेली. तिच्या गावात किशोरींचा सावित्रीबाई फुले गट तयार णाला. शिबिरे, कार्यक्रम या निमित्ताने तालुक्यातील इतर गावातील महिला आणि मुलींशी संवाद होऊ लागला. त्यांच्याशी शौचालये आणि त्यांचे महत्त्व यावर चर्चा झाल्या. सरकारी कार्यालयांत महिलंसाठी शौचालये नाहीत, या मुद्द्यावर गटाच्या मुलींनी महिला आणि बालविकास मंत्री पंकजा मुंडे यांची भेट घेतली. त्यांनी ही स्थिती मान्य करुन बदलाचे आवश्वासन दिले. योगिताच्या गटाने आता खालापूरी गावात काम सुरु केले आहे. तेही लवकरच हागणदारीमुक्त होईल अशी तिची खात्री आहे. पूर्ण तालुकाभर पथनाट्ये, लघुपट या माध्यमातून स्वच्छता अभियान लोकांपयर्धंत पोहोचवणं आणि अधिकाधिक महिला आणि मुलींना त्यात सहभागी करुन घेण्याचा योगिताचा प्रयत्न आहे !

# किशोरींची मैत्रीण

मुक्ता गिते

गावातली एक आशा सेविका गावातल्या किशोरींना एकत्र करताना गाव बदलण्यासाठी सज्ज झाली. गावातल्या महिलांना सोबत घेऊन ' लेक लाडकी अभियाना'च्या भक्कम पाठिंब्यावर तिने हे करुन दाखवलं

शिरुर तालुक्यात राहूनही मुक्ता गिते बालविवाहाच्या शिकार झाल्या नाहीत. याचं कारण त्यांची वहिनी. भाऊ आणि वहिनी सुशिक्षित. वहिनीने भावाकडे आग्रहच धरला की काहीही झाले तरी मुक्ताचे लग्न १८ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय लावायचे नाही. त्यामुळे बारावीची परीक्षा दिल्यावर त्यांचे लग्न झाले. भाऊ आणि वहिनीमुळे घरातही प्रगतीशील विचार कायमच असाचे. लिंबा हे त्यांचे माहेर आणि सासरही. त्यामुळे हा पाठिंबा कायमच राहिला. दहा वर्षापूर्वी त्यांना गावतल्या सिस्टरने जेव्हा सांगितले की अशा वर्कर म्हणून काम करण्याची संधी आहे. तेव्हा चालून आलेली ही संधी त्यांनी सोडली नाही. गाव छोटे बाराशे लोकवस्तीचे, त्यात दुर्गम. त्यामुळे गावाची आशा वर्करवर मोठी भिस्त. स्वत:चेच गाव असल्यामुळे लोकांना नाही म्हणणजे जमायचे नाही आणि मुक्तातार्इंच्या ते स्वभावासाठी नव्हते.

आशा वर्कर म्हणून काम सुरु होते. वेगवेगळी सर्वेक्षणं, रुग्णसंख्या, लसीकरण, गर्भवतींच्या नोंदी अशी सगळी कामे करुन हाताशी पैसा फार लागत नव्हता. पण जे काम करायचे ते मनापासून असा शिरस्ता असल्याने समाधान होतं. कामाची पाच पुरुस्कारांच्या रुपाने मिळाली. त्यांना तालुका स्तरावर दोन आणि जिल्हा स्तरावर दोन पुरस्कार मिळाले. कामाचा हुरुप वाढला. त्याचवेळी ' लेक लाडकी अभियाना'चे काम शिरुरमध्ये सुरु झाले होते. मुक्ताताई एक दोन बैठकांना उपस्थित राहिल्या. त्यांचं काम चांगलं होतंच. शिवाय किशोरवयीन मुलींसोबत काम करण्याची तयारीही होती. वेगवेगळ्या गावांतील अशा सेविका हा या प्रकल्पाचा कणा होता. या आशांशी संपर्क ठेवायचं काम मुक्तातार्इंकडे सोपवण्यात आलं. त्या आनंदाने तयार झाल्या.



गावात काम सुरु असताना आधी किशोरवीयन मुलींचा गट तयार करायचा होता. मुलींची नावे होतीच, त्यांना एकत्र करायचे होते. मुक्तातार्इंनी प्रत्येक मुलीच्या घरी जाऊन प्रकल्प काय आहे, हे समजून द्यायला सुरुवात केली. मुलींच्या घरातील लोक आधी हो. हो म्हणून नुसतेच ऐकून घेत. मुलींना मिटिंगला पाठवायची मात्र त्यांची तयार नसे. पण मुक्तातार्इंनी अजिबात निराश न होता आपले काम सुरुच ठेवले. मुलींना आरोग्याबद्दल, स्वच्छतेबद्दल सांगू लागल्या. मुलींना ते आवडू लागले. त्या स्वत:च आता गटाची मीटिंग कधी आहे. असे विचारु लागल्या. हळूहळू लोकांचा विश्वास बसू लागला. गावातल्या सगळ्या किशोरवयीन मुलींनी मिटिंगला हजेरी लावायला सुरुवात केली. त्यांचा गट तयार झाला. नाव दिलं. सावित्रीबाई फुले गट. गेली दोन वर्षे गावात बालविवाह होऊ नये म्हणून सर्वतोपरी प्रयत्न केला जातोय. बालविवाह ठरवणाऱ्या आई-वडिलांना प्रत्यक्ष भेटणे त्यांचे समुपदेशन करणे. तरीही ऐकले नाही तर कायद्याचा धाक दाखवणे अशा अनेक गोष्टी गावात कराव्या लागल्या.

मुक्तातार्इंच्या पुढाकाराने गावात तीन बालविवाह थांबले. एक मुलगी आठवीत होती. आई-वडील ऊस तोडायला जायचे मुलीचे लग्न गुपचूप करण्याचा त्यांचा विचार होता. ते कुटुंब मुक्तातार्इचे शेजारी, त्यांना वाटले ओळखीमुळे मुक्ताताई गप्प बसतील. पण मुक्तातार्इंनी स्पष्टपणे लग्न थांबवण्याचा इशारा दिला. वर्षातार्इंनी त्यांना भेटून समजावले. पालकांना पटलेही आता ती मुलगी दहावीत शिकते आहे. इतर दोन प्रकरणांतही मुली लहान, आठवीतल्याच होत्या. गावात शाळा आठवीपर्यंत. त्यामुळे त्यानंतर शिक्षणाची सोय नाही. त्यामुळे पालक ऊसतोडीला जातात, काळजी नको म्हणून मुलींची लग्न उरकून टाकत. आणखी दोन लग्नही पालकांना पटवून दिल्यावर थांबली. गेली दोन वर्षे गावात एकही बालविवाह झालेला नाही. १८ वर्षे पूर्ण होण्याआधी लग्नाचा विचार केला तर तुरुंगात जावे लागेल ही धास्ती आहे. गावात ० ते ६ वयोगटात मुलींची संख्याही वाटते आहे. गर्भलिंगनिदान चाचण्या आणि त्यामुळे होणारे गर्भपात थांबले आहेत. गावात महिलांची ग्रामसभा असते. हेच माहित नव्हते. अभियानाचे काम सुरु णालयवर महिलांच्या ग्रामसभा होऊ लागल्या. बायका गावाच्या, आपल्या प्रश्नांबद्दल बोलू लागल्या ११ ते १९ वयोगटातल्या मुली किशोरी गटात आहेत. प्रत्येक गावात असे गट तयार केले आहेत. अशा १० गावांसाठी एक किशोरीमित्र नेमला आहे. मुलींना या अभियानातून 'ओळख स्वत:ची' हे पुस्तक दिले जायचे. मुलींनी ते वाचून एक प्रश्नावली भरुन देणे अपेक्षित होते.

या प्रश्नावलीत दोन भागात उत्तरे लिहून घेतली जात. एका भागात होय किंवा नाही असे प्रश्न असायचे तर दुसऱ्या भागात सविस्तर उत्तरे अपेक्षित होती. मुलींमधील वर्तनबदल यांतून समोर येत होते.

आता गावात सरकारी नियमांनुसार बालसंरक्षण समित्या नेमण्यासाठी मुक्ताताई प्रयत्नशील आहेत. या समितीत आशा, अंगणवाडी सेविका, सरपंच, उपसरपंच, पोलिस पाटील आणि इतर असे ११ जण असतात. ग्रामपंचायतीत यांच्या नावाच्या पाट्या लागल्या आहेत. गावांत होणाऱ्या बालविवाहांसाठी या पूर्ण समितीलाच जबाबदार धरले जाणार असल्याने गावांत याबद्दल अधिक जागरुकता आहे. मुली स्वत:च्या आरोग्याविषयी सजग झाल्या आहेत. मासिक पाळीदरम्यानच्या स्वच्छतेचे महत्त्व त्यांना पटल्यामुळे त्या आता कापड न वापरता सॅनिटरी पॅडसाठी आईकडे आग्रह धरतात. स्वत:च्या सुरक्षेची काळजी घेणं त्यांना जमू लागलं आहे.

मुक्तातार्इंचे गावाच्या इतर प्रश्नांतही लक्ष असते. लिंबा गावात शाळेची इमारत तीन वर्षांपूर्वी कोसळली मुली वर्गात होती. भिंती बाहेर कोसळल्या म्हणून दुर्घटना टळली. तरीही एका मुलीच्या डोक्यात वीट कोसळून ती जखमी झाली होती. गावकऱ्यांची शाळा दुरुस्ती करण्याची आर्थिक कुवत नव्हती. त्यामुळे मुले रोज जीव मुठीत घेऊन त्या पडक्या शाळेत बसत होती. किशोरी गटातल्या मुली आणि मुक्ताताई यांनी मिळून वर्षातार्इंना परिस्थिती दाखवली. एकूण सारेच धक्कादायक होते. 'लेक लाडकी अभियाना'ने स्वत: शाळेच्या दुरुस्तीसाठी ८० हजार रुपये दिले. गावातूनच कंत्राटदार नेमला. शाळा दुरुस्त झाली. आठ वर्गखोल्या तयार झाल्या. १५ ऑगस्टला गावकऱ्यांनी मुक्तातार्इंचा सत्कार केला. दुसरीकडे नव्या इमारतीसाठीही पाठपुरावा सुरु केला आहे. आता गावासाठी शाळेची नवी इमारत बांधायचे काम सुरु आहे. अजूनही मुक्ताताई समाधानी नाहीत. त्यांना गावच्या शाळेत संगणक आणायचे आहेत. मुलांना प्राथमिक शाळेतच संगणकाचे प्राथमिक शिक्षण मिळायला हवे असे त्यांना वाटते. त्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु आहेत.

लिंबा बाराशे लोकवस्तीचं छोटंसं गाव असलं तरी गावात दारुची तब्बल चार दुकानं. लोक सकाळी सहा वाजल्यापासून या दुकानांत हजेरी लावत. मुक्ताताई अगदी लहानपणापासून दारुमुळे घरं, कुटुंब उद्‌धवस्त होताना बघत होत्या. लेक लाडकी अभियान आणि गावातला किशोरींचा गट यांना हे चित्र बदलायचे होते. गावातली दारु बंद करायची. हे त्या सगळ्यांनी मिळून पक्के ठरवले. वर्षा देशपांडे यांनी स्वत: यात लक्ष घातलं. चार वेळा गावात स्वत: जावून आल्या. मीटिंग घेतल्या. बायकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. कितीतरी

जणींना अश्रु अनावर झाले. महिलांनी एकत्र येऊन गावातली दारुची दुकाने बंद करायचे ठरवले. ८० महिलांनी अर्जावर सह्या केल्या. मात्र दारुच्या दुकानदारांचा दबाव इतका होता की पोलिस ठाण्यात हा अर्ज घेतलाच गेला नाही. सलग १६ दिवस कार्यकर्ते पोलिस स्टेशनला जात होते पण पोलिसांनी दाद दिली नाही. अखेर वर्षा देशपांडे यांनी स्वत: बीड अधीक्षकांना फोन केला, निवेदन दिले.

स्वत: पोलिस अधीक्षक गावात आले. बेकायदा दारु विक्री करणाऱ्या चारही जणांना पकडून नेले. एकाच्या घरात तर चक्क परदेशी दारुने भरलेली खोकी आढळली. सध्या तरी गावात शांतता आहे. ' किती दिवस दारु बंद होते ते बघूच' अशी दबक्या आवाजात चर्चा सुरु आहे. पण गावात आता पुन्हा दुकान उघडलं जाणार नाही. हे मुक्ता ताई आणि किशोरींनी पक्क ठरवलं आहे. मुक्ताताईचे पती आधी काही वर्षे आश्रमशाळेत काम करत होते. अनुदान मिळाले नाही म्हणून अखेर नोकरी सोडून शेती करण्याचा निर्णय घेतला. पतीची मुक्ताताईंना पूर्ण साथ आहे. एक मुलगा आणि मुलगी महाविद्यालयात शिकत आहेत. शिक्षण आणि सुरक्षा दिली तर मुली जग बदलू शकतात यावर त्यांचा विश्वास आहे.

# बदलाची साक्षीदार

नीता ढाकणे

अंगणवाडी मदतनीस म्हणून काम करणारी नीता लेक लाडकी अभियानाच्या माध्यमातून शिरुर तालुक्यातील किशोरींच्या सक्षमीकरणाच्या कामात सहभागी झाली. मुलींच आयुष्य बदलत गेल आणि त्यासोबत नीताचंही.

नीत राहते शिरुरमध्ये. तिचं शिक्षण एमए बीएड. २०१३ मध्ये तिचं लग्न झालं आणि २०१४ मध्ये ती एका मुलीची आई झाली. २०१६ पर्यंत घर, संसार, मुलगी याच विश्वात ती रमली होती. दरम्यानच्या काळात एका अंगणवाडीत मदतनीस म्हणून तिनं काम सुरु केलं होतं. २०१६ मध्ये ती लेक लाडकी अभियानाच्या संपर्कात आली. शिरुरमध्ये एक मोठा किशोरी मेळावा झाला. तालुक्यातल्या मुली त्यानंतर अभियानाशी जोडल्या गेल्या. आशाताईंचा या कामात खूप मोठा सहभाग होता. त्यामुळे त्यांचं प्रशिक्षण, किशोरींचे गट, त्यांचे प्रशिक्षण अशा कामांमध्ये नीताचा सहभाग होता.

अभियानाचे कार्यक्रम मुलींपर्यंत पोहोचवण्याचे माध्यम म्हणून काम करताना येणारे अनुभव वेगळे होते. त्यात एक स्थानिक म्हणून येणाऱ्या जबाबदाऱ्या वेगळ्या होत्या. बालविवाहांच्या प्रश्न प्राधान्याने हाती घेतला होता. पण त्यावेळी वयात आलेल्या मुलींचे ऊसतोडीला जाताना काय करायचं ? त्यांच्या सुरक्षेची हमी कोण देणार ? अशा प्रश्नांची समाधान करणारी उत्तरं पालकांना द्यायची होती. वेगवेगळ्या कोर्सेसमधून आणि प्रशिक्षणामधून ते शक्य झालं.मुलींना शिकवणं कसं महत्त्वाचं आहे. याची जाणीव पालकांना करुन देता आली. हे सारं करताना मुलींना आपलेपणा वाटावा म्हणून कन्यादिनाचा कार्यक्रम झाला. मुलींना भरपूर धमाल केली. गाणी म्हटली, मेंदी काढली, हव्या त्या छान छान बांगड्या घातल्या ! मुलींना ‘अभियान आणि अभियानाचे कार्यकर्ते’ म्हणजे विश्वासाचं दुसरं कुटुंब वाटू लागलं. नीताशी आता या मुली मैत्रिणीच्या नात्याने बोलतात, तिला अडचणी



सांगतात.

गेल्या दोन वर्षात शिरुरमधल्या मुलींच्या बदलत्या आयुष्याची नीता साक्षीदार आहे. आधी घरात, शाळेत मुलींना कुठेही कोणत्याही गोष्टीसाठी पाठिंबा मिहत नसे. त्यांच्या इच्छा, अशा आकांशा याबद्दल कुणाला फारसं देणंघेणं नसायचं. पण मुली अभियानाशी जोडल्या गेल्यानंतर त्या मोकळेपणाने व्यक्त होऊ लागल्या. स्वत:विषयी बोलू लागल्या, स्वत:बद्दल ठरवू लागल्या. स्वत:वर झालेल्या अन्यायाबद्दल आवाज उठवू लागल्या. आता त्या एकमेकींना मदत करतात, एकमेकांसाठी उभ्या राहतात. याही पलीकडे जाऊन 'लेक लाडकी अभियान' आपल्यामागे उभे आहे. याचा विश्वास मुलींना वाटतो. हा बदल बघणं आणि या बदलाच्या प्रक्रियेचा एक भाग होणं हे नीताला खूप समाधान देणारं वाटत. गेल्या दोन वर्षांत अनेक कार्यक्रम झाले. किशोरी मेळावा झाला. जनसुनावनी झाली. मुली तिथं बोलल्या. त्यांच्या अडचणी त्यांनी अधिकारी आणि इतर वरिष्ठांसमोर मांडल्या. मुलींना अभियानातर्फे शाळेत जाण्यासाठी सायकली दिल्या गेल्या. त्यांची शाळेची वाट सोपी झाली. या अभियानाचा भाग होताना नीताचं आयुष्यही बदललं. आत्मविश्वास आला. आधी एक गृहिणी आणि अंगणवाडी मदतनीस एवढंच विश्व असणाऱ्या नीताचं क्षितिज विस्तारलं. वयात येणाऱ्या मुलींच्या शरीरातले बदल त्यांना शास्त्रीय पध्दतीने सांगताना आपल्याला नीतासह इतर कार्यकर्त्यांचे फोन नंबर मुलींकडे आहेत. कुणाचा बालविवाह होता आहे असे वाटले, कुणाला आणखी काही समस्या असतील तर मुली विश्वासाने फोन करतात. काही निनावी फोनही येतात. त्यांना योग्य मदत मिळेल असं पाहिलं जाते. अभियानाने तालुक्यातल्या लोकांचे विचार बदलले. असे नीताला वाटते. नीता शिरुरमध्ये २०१५ पासून अंगणवाडी चालवते. तिची अंगणवाडी असलेला परिसर झोपडपट्टीचा. शिरुरमध्ये एकूण सात अंगणवाड्या त्यात ही सगळ्यात गरीब वस्तीतली. अंगणवाडीसाठी नीताला एक पडकी खोली मिळाली होती. त्या कोपऱ्यावर वस्तीतले लोक लघुशंका करायचे. खिडकी उघडकी की भपकारा यायचा. दरवाजा तुटका होता. त्यातून फिरस्ते कुत्रे, डुकरं आत यायची.त्यांनी रात्री घाण करुन ठेवलेली असायची. पाण्याची काही सोय नव्हती. अशा वातावरणात मुलांना पोष आहार द्यावा लागायचा. नीताला याचा भयंकर त्रास व्हायचा, अपराधी वाटायचं पण पर्याय नव्हता. लेक लाडकी अभियानाशी संपर्क आल्यावर तिने एकदा वर्षा देशपांडे यांना तिची अंगणवाडी नेऊन दाखवली. त्या तिथं उभ्याही राहू शकल्या नाहीत इतकी घाण होती. दरम्यानच्या काळात पंचायत समितीने

एक खोली तिला तात्पुरती वापरायला दिली. ती चांगली प्रशस्त आहे. पण त्या जागेच्या जवळच लोक दिवसभर पत्त्यांचा अड्डा टाकून बसलेले असत.

दरम्यान लेक लाडकी अभियानाने नीताच्या अंगणवाडीची दुरुस्ती करुन द्यायचं ठरवलं. दुरुस्ती पूर्ण झाली. काम सुरु असताना मुलं तिथं जायची. गवंडी काम करत असताना त्यांना स्वत: विटा आणून द्यायची. आमची अंगणवाडी लवकर बांधा म्हणायची. मधल्या काळात नीता एका प्रशिक्षणासाठी बाहेर गेली होती. ती परत आल्यावर मुलं तिला अक्षरश: ओढतच बांधकाम बघायला घेऊन गेली. आपली शाळा बघा किती छान झाली आहे. असं मुलं म्हणत होती. तो आनंद, उत्साह बघून डोळ्यांत आनंदाश्रू दाटल्याचं नीता सांगते.

नीताच्या अंगणवाडीजवळ इंग्रजी माध्यमाच्या दोन शाळा आहेत. ती मुलं चकाचक कपडे घालून तयार होऊन जाताना ही मुलं बघतात. त्यांना प्रश्न पडायचे. आपली शाळा अशी का नाही, आपले कपडे असे का नाहीत.. मात्र त्यांची शाळा छान झाली आहे. दोन खोल्या, स्वच्छतागृह, पाण्याची सोय आणि कंपाऊंड घातलेली मोठ्ठी खेळायची जागा. मुलं खुश आहेत. लवकरच एक छान बाग करायची असं नीता ठरवले. तिची अंगणवाडी जिथं आहे तिथली माणसं रोज मजुरी करुन पोट भरतात. अशा लोकांच्या मुलांसाठी उत्तम दर्जाचं पूर्वप्राथमिक शिक्षण देण्याचं काम करण्यात मोठा आनंद असल्याचं ती मानते. लेक लाडकी अभियानाच्या माध्यमातून एकाच वेळी किशोरवयीन मुली आणि पूर्वप्राथमिक शिक्षण घेणारी मुलं अशी दोन टप्प्यांवरची आयुष्यं बदलण्यात आपला खारीचा वाटा आहे. यांच समाधान आहे. हे करताना स्वत:मध्येही बदल घडवता आले. यापुढे अनेक पातळ्यांवर बदलांची ही प्रक्रिया सुरुच राहावी, असं नीताला वाटतं.

# विश्वासाचं नेटवर्किंग

जयश्री चिपाडे

बालविवाह झाल्यामुळे आयुष्यात किती मोठी किंमत मोजावी लागते हे स्वत: अनुभवलेल्या जयश्री चिपाडे यांनी हे दुर्दैवाचे फेरे आता आणखी कुणाच्या वाट्याला येऊ नयेत यासाठी कंबर कसली आहे. शिरुर तालुक्यात गावागावात असलेल्या त्यांच्या जनसंपर्कातून आता मुली आणि महिलांसोबत त्यांच विश्वासाचं नेटवर्क तयार झाले आहे.

जयश्री चिपाडे यांचे हिवरशिंगा हे मूळ गाव, २००२ पासून त्या बचत गटांमध्ये काम करत आहेत. अनेक सरकारी योजनांच्या प्रशिक्षणाची जबाबदारी त्यांनी पार पाडली आहे. गेली कित्येक वर्षे तालुक्यातील प्रत्येक गाव कामाच्या निमित्ताने पिंजून काढावं लागलं. त्यामुळे गावागवात लोक त्यांना ओळखतात, महिला आपुलकीने बोलतात, अडचणी सांगतात. शिरुर तालुक्याचे आरोग्य अधिकारी डॉ. राजेश तांदळे ‘ लेक लाडकी अभियाना’च्या शिरुर तालुका प्रकल्पाशी जोडले गेले होते. त्यांना जयश्रीताईंचे काम माहित होतं. काम सुरु होताना कुमारवयीन मुलींसाठी काही ट्रेनर्स हवे होते. जयश्रीताई स्थानिक आणि मुलींच्या प्रश्नाची जाण असलेल्या असल्यानं डॉ. तांदळे यांनी त्यांना विचारलं. त्यांनीही आनंदाने होकार दिला. ज्या वयोगटात काम करायचं होतं. त्या सर्व नुकत्याच वयात आलेल्या किंवा येत असलेल्या मुली होत्या. कुटुंबात बहुतांश सदस्य अल्पशिक्षित, शेतकरी किंवा ऊसतोड कामगार. मुलींना या वयातले शारीरिक आणि मानसिक बदल समजावून सांगणं आणि या काळात आरोग्य, आहार यांची कशी काळजी घ्यायची. यासंदर्भातली प्रशिक्षण शिबिरं त्यांनी तालुक्यात घेतली. एवढंच नव्हे तर या दिवसातले मानसिक, भावनिक बदल कसे हाताळवेत, शिक्षण, भावी आयुष्यावर या काळाचा किती खोलवर परिणाम होत असतो, हेही मुलींनी समजून सांगितलं.



मुलींचे पालक ऊसतोडीसाठी गेले की किमान पाच - सहा महिने बाहेरच असतात. या काळात या अडनिड्या वयातल्या मुली गावात एकट्या राहतात. काही घरांत सोबत वृद्ध आजी-आजोबा असतात. याचा फायदा शेजारी, नातेवाईक, गावगुंड घेतात. मुलींना स्पर्श करणं, लगट करणं या घटना नेहमीच्या होतात. अशा ओळखीतून फसवून बलात्कारही होतात. मुलींना पळवण्याचे प्रकारही घडतात. त्यामुळे त्यांना त्यांच्या शरीराविषयी, बदलांविषयी, गभधारणेच्या प्रकियेविषयी सांगणं गरजेचं होतं. नेमकं तेच काम जयश्रीताईंनी जबाबदारीनं पार पाडलं. या मुलींना आधी विश्वासात घेणं गरजंच होतं. त्यामुळे प्रशिक्षणात त्या थोडी वेगळी कल्पना राबवायच्या. सुरुवात स्वत:पासून, स्वत:च्या कुमारवयातील अनुभवांपासून करायच्या. त्यामुळे मुली लवकर मोकळ्या व्हायच्या. अवघडेपण दूर व्हायचं आणि एखाद्या मैत्रिणीला सांगावेत. तशा मुली स्वत:चे अनुभव सांगू लागायच्या. मग काम सोपं व्हायचं. त्यांनी काही तक्ते आणि चित्रे यांचा वापर प्रशिणिासाठी केला. आपलं शरीर नेकं कसं आहे. वयात येताना त्यात काय बदल हातात आणि गर्भधारणा होते, म्हणजेच नेमके काय होते, हे त्या चित्रांचा वापर करुन त्या मुलींना सांगायच्या. हे खूप परिणामकारक व्हायचं. मुली बारकाईने ऐकायच्या समजून घ्यायच्या. परक्या अनोळखी पुरुषांशी कसं वागावं. याची जाण मुलींना आली. कुणी अनावश्यक लगट करत असेल. कुणी विनाकारण भेटी आणत असेल तर सावध का व्हायचं. जवळचे नातेवाईक कसे शोषण करु शकतात. अशा सगळ्या बाजू त्या मुलींना सांगत. त्यामुळे मुली अधिक सजग झाल्या.

शिरुर तालुक्यात छोटी गावे आणि वाड्या-वस्त्या भरपूर आहेत. मुलींना शाळेसाठी दुसऱ्या गावात जावे लागते. बहुतेक ठिकाणी वाहनाची सोय नाही. त्यामुळे बहुतांश शाळकरी मुली दररोज पायी चार-पाच किलोमीटर अंतर पार करतात. रस्त्यात मुलींना अडवणं. त्राण देणं. विनयभंग, छेडछाड असे प्रकार घडतात. आई-वडील बाहेरगावी असतात. मुलींनी तक्रार करावी तर कुठे, हा प्रश्न असतात. दबावही असतो. त्यांच्यावर. त्यामुळे त्या गप्प बसून सहन करतात. या प्रशिक्षणात मुलींना शाळेच्या वाटेवरची छेडछाड कशी रोखायची हेही सांगितलं गेलं. वेळ पडली तर मोठ्याने ओरडनं, डोळ्यांत तिखटाची पूड फेकणं, चिमटे काढणं, चावणं यातूनही प्रतिकार होऊ शकतो याची जाणीव दिली. मुलींना आता आत्मविश्वास आला आहे. न घाबरता त्या घरात, गावात, शाळेत वावरु लागल्या आहेत.

जयश्रीताईंनी प्रशिक्षण शिबिरांची एक पध्दत ठरवून घेतली होती.

किशोरवीयन मुलींचे गट आशाताईंच्या मदतीने आधीच तयार झालेले होते. त्या गावात आशाताईंना आधी निरोप द्यायचा आणि ठरलेल्या वेळी पोहोचायचे. गटातल्या मुली अगदी उत्साहाने यायच्या. त्यांचा प्रतिसाद जोरदार असायचा. जयश्रीताई हमखास सगळ्या प्रशिक्षण शिबिरांमध्ये त्यांच्या तालुक्यात घडलेले काही प्रसंग सांगतात. या गावात एका घरातल्या दोन किशोरवयीन बहिणी होत्या. त्यांचे लग्न शाळकरी वयात लावून देण्यात आलं. लग्नाला वर्ष होण्याआधीच मुली गरोदर राहिल्या आणि बाळंतपणासाठी माहेरी आल्या. दुर्दैव असं की दोघींनाही त्यांच्या बाळाला पाजायला दूधच आलं नाही. एवढीशी मुलं उपाशीपोटी रडत राहायची.. शेवटी भरपूर पैसे खर्च करुन उपचार करावे लागले. हा पैसा आई-वडिलांनाच उभा करावा लागला. शेतीतलं, घरातलं काम सोडून रुग्णालयात हेलपाटे मारावे लागले.

एका मुलीनं त्यांना सांगितलं होतं. आई-वडील ऊसतोडीला गेल्यावर शेजारी राहणारे एक आजोबा तिला जवळ घेऊन डोक्यावरुन हात फिरवत ' जेवलीस का ?, बरी आहेस का?' वगैरे चौकशी करायचे. ती विरोध करत नाही हे पाहून त्यांनी तिला शरीरभर स्पर्श करायला सुरुवात केली. आजोबाच असल्याने मुलीला काही बोलता येईना. अखेर ते घरी आलेकी ती तिच्या आजीजवळ जावून बसू लागली. त्यानंतर ते याचेच बंद झाले. दुसरा अनुभवही भयंकर होता. एका गावात एका घराच्या कामावर गवंडी होता. तो मधूनच समोरच्या घरात पाणी मागायला जायचा. तिथे राहणारी छोटी मुलगी पाणी द्यायची. तो तिच्याशी गोड बोलायचा, स्पर्श करायचा. एक दिवस त्याने तिला समोरच्या मक्याच्या शेतात बोलावले. ती गेली, कुणी तरी पाहिलं आणि इतरांना सावध केलं. सगळ्यांनी जोरदार आरडाओरडा केल्यावर तो गवंडी पळून गेला तो आजतागायत परत आलेला नाही. एक भयंकर घटना होता होता वाचली. या घटना ऐकल्या की मुली अस्वस्थ होतात. आसपासचं उदाहरण ऐकलं की मुलींना ते अधिक जवळचं वाटतं आणि पटलंही, असा जयश्रीताईंचा अनुभव आहे. जयश्रीताईंनी तालुक्यातल्या ३६ गावात प्रशिक्षण कार्यक्रम घेतले आहेत. मुलींना आता या बाबत शहाणपण येतंय. जयश्रीताईंना शेजारच्या पाटोदा तालुक्यात एका सर्वेक्षणासाठी जावं लागलं होतं. पानभर प्रश्न होते. त्यांची मुलींनी दिलेली उत्तरं तपासताना ध्यानात आलं की शिरुर तालुक्यातल्या मुलींना अधिक माहिती आहे. त्या स्वत:च्या शरीराविषयी, स्वत:चया अधिकारांविषयी अधिक जागरुक आहेत. गेली दोन वर्षे अभिमान, प्रशिणि कार्यक्रम यातून ते साध्य होऊ शकलं आहे. या त्यांच्या प्रवासात जयश्रीताई स्वत:ही सक्षम झाल्या आहेत. मुलींमध्ये त्या स्वत:चे

आयुष्य बघतात. जयश्रीताईचे माहेर माजलगाव. त्या सातवीत असताना लग्नाची बोलणी सुरु झाली आणि काही कळायच्या आधीच पंधराव्या वर्षी लग्न झालंही. घरात आल्यापासून शेतीची जबाबदारी डोक्यावर आली. लग्नानंतर १८ वर्षे पतीसोबत त्यांनी शेती केली. वाटायचं, शिकले असते तर काही तरी वेगळे करता आलं असतं. २००० च्या सुमारास बचतगट चळवळीने जोर धरला. २००२ मध्ये जयश्रीताईंनी स्वत: चा बचतगट सुरु केला. त्याचं रेकॉर्ड ठेवावं लागायचं. सरकारी अधिकारी म्हणायचं. इतके व्यवस्थित काम करता तुम्ही तर नोकरी का नाही करत ? ओशाळे होऊन त्या म्हणायच्या ‘ माझं शिक्षण नाही हो फारसं फक्त सातवी शिकले आहे. ’ पण सारखी ही उत्तरे देणं सुरेखा ताईंना जड जात होतं. शेवटी मनाशी निश्चय केला की बाहेरुन परीक्षा द्यावयाच्या. मुक्त विद्यापीठात प्रवेश घेतला आणि एक एक परीक्षा देत त्या बीए झाल्या. पदवी मिळवण्याचा आनंद मोठा होता.

लग्न झाल्यावर काही दिवसांनी अंगणवाडी मदतनीस म्हणून काम करायचं होतं. त्याच्या सासू सासऱ्यांनी तेव्हा परवानगी दिलेली नव्हती. पण नंतर मात्र त्या आग्रही राहिल्या. एका सहकारी संस्थेत त्यानी काही दिवस काम केलं. त्यानंतर बचत गट चळवळीत त्या सक्रिय झाल्या. वेगवेगळ्या सरकारी योजनांच्या प्रशिक्षणासाठी ट्रेनर म्हणून त्यांच नाव जिल्ह्यात अग्रक्रमाने घेतलं जातं. या वेगवेगळ्या प्रतशिक्षणांच्या निमित्ताने त्यांनी पूर्ण तालुका पायाखाली घातला आहे. प्रत्येक गावात त्यांच्या ओळखी आहेत. या नेटवर्किंगचा फायदा त्याना प्रशिक्षणादरम्यान झाला. लग्न लवकर झाल्यामुळे काय काय वाट्याला येते हे त्याना पाहिले आहे. त्यामुळे या मुलींना तरी तो त्रास होऊ नये असे त्यांना वाटतं. शिरुर तालुक्यातल्या मुली बदलत आहेत. सोबत तालुक्याचं भविष्यही बदलतंय. या बदल्याच्या साक्षीदार असल्याचं समाधान व्यक्त करत जयश्रीताई नव्या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी मुलींना तयार करताहेत.

# सक्षमीकरणाची वाट

शोभा वाघुलकर

आरोग्य विभागात काम करताना त्यांना किशोरी आणि महिलांच्या आरोग्यासाठी वेगळं काम करण्याची संधी लेक लाडकी अभियानाच्या कामातून मिळाली मुली आणि महिलांना आरोग्य प्रश्नाबाबत प्रशिक्षणाच्या माध्यमातून सजग करताना त्यांना स्वत:बद्दलही आत्मविश्वास मिळाला.

शोभा आरोग्य सेविका आहेत. आरोग्य केंद्रात एएनएम म्हणून काम करत होत्या. शिरुर तालुका आरोग्य केंद्रामध्ये त्या बदलून आल्या तेव्हा त्यांच्याकडे तालुका नर्सिंग ऑफिसर या पदाचा कार्यभार सोपवण्यात आला. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेश तांदळे ‘ लेक लाडकी अभियाना’चे अनेक वर्ष मार्गदर्शक आहेत. महिला आणि मुलींच्या सक्षमीकरण कार्यक्रमात त्यांचा नेहमीच पुढाकार असतो तर अभियानाशी संबंधित असलेल्या ढाकणे सिस्टर शोभा यांची मैत्रीण. या दोघांमुळे लेक लाडकी अभियानाने तालुक्यात जेव्हा काम सुरु केले तेव्हा या कामात आपला सहभाग असला पाहिजे. हे त्यांना प्रकर्षान वाटलं. या कामासाठी रोजच्या कामामधून थोडा वेळ काढावा लागणार होता. पण यासाठी त्यांची तयारी होती. मोहिमेची सुरवात झाली शिरुरमध्ये झालेल्या एका प्राथमिक शिबिरातून त्यात सगळ्यांच्या ओळखी झाल्या. तालुक्यात नक्की काय स्वरुपाचे काम राबवायचे आहे. याबबात कल्पना आली. त्यानंतर पुढचे प्रशिक्षण सातात्यात झाले. किशोरवीयन मुलींसाठी काम करायचे होते. त्यांच्या गटांचे प्रशिक्षण घ्यायाचे होते. या वयोगटातील मुलींच्या आरोग्यविषयी मुलींना बोलते करुन त्यांचे प्रश्न सोडवायचे होते. शोभा खरे तर आरोग्य विभागात काम करणाऱ्या



पण तरीही हे प्रशिक्षण त्यांना अनेक नव्या गोष्टी शिकण्यसाठी उपयोगी पडलं. विशेषत: किशोरवयीन मुलींच्या मानसिकतेबद्दल अधिक स्पष्टता आली.

त्यांनी या किशोरवयीन मुलींचे प्रत्यक्ष प्रशिक्षण घेतले तेव्हा या मुलींकडून मिळालेला प्रतिसाद अत्यंत अनपेक्षित होता. मासिक पाळी, जनन आरोग्य या

विषयांवर घरात, बाहेर, शाळेत कुठेच मोकळेपणाने बोलले जात नसल्याने मुलींच्या मनात अनेक शंका, होत्या. प्रश्न होते. या प्रशिक्षणामुळे अनेक दिवस कोंडून ठेवलेल्या प्रश्नांना वाट मिळाली. मुली बोलत्या झाल्या. त्यानी मनातल्या अगदी छोट्या छोट्या शंकांचे निरसन करुन घेतले. अशी माहिति त्यांना आजवर कुणी दिलीच नव्हती. त्यामुळे मासिक पाळी, मातृत्व याबद्दल त्यांच्या मनात उगाचच असणारे अपराधीपण दूर झाले. मुलींना आत्मविश्वास आला. या प्रशिक्षणाचा आणखी एक फायदा म्हणजेच मुली बाहेरही बोलू लागल्या. प्रश्न विचारण्यातला संकोच दूर झाला. दुसऱ्या टप्प्यात तालुक्यातल्या महिलांनाही सहभागी करुन घेण्यात आलं. तो अनुभवही वेगळाच होता. ओळख स्वत:ची, दारुबंदी, मुलगा-मुलगी एकसमान, बालविवाहबंदी असे अनेक विषय प्रशिक्षणाच्या माध्यमातून मुली आणि महिलांपर्यंत पोहोचवायचे होते. त्यातून स्वत: ही नकळत सक्षम झाल्याचं शोभा सांगतात.

महिला ग्रामसभा हा प्रकार या भागात फक्त कागदावरच असायचा. अभियानाच्या माध्यमातून प्रथमच तालुकाभर महिलांच्या सभा झाल्या जवळपास १००% उपस्थिती असलेल्या या सभांमधून महिलांना आपल्या कायदेशीर हक्कांची जाणीव झाली. मनात आणले तर महिलांचे मत गावच नव्हे तर देशही बदलू शकते. हा विश्वास त्यांना मिळाला. आजवर गावातल्या महिला बाहेर पडून जाहीरपणे आपले प्रश्न मांडत आहेत. असे कधीही झालं नव्हतं. ते प्रथमच तालुक्यात घडलं. त्याही पुऐ पाऊल टाकत तालुक्यात घरावर आणि सातबाऱ्यावर पती-पत्नीचे दोघांचे नाव असावे. या संकल्पनेतून घर दोघांचे आणि लक्ष्मीमुक्ती अशा दोन योजनांबद्दल चर्चा केली. या सगळ्याचा परिणाम म्हणून पुरुषांच्या विचारांतही बदल झाला. मुलींचं लहानपणी लग्न न करता त्यांना शिकवायला हवं, हे त्यांना पटू लागलं. अनेक ठिकाणी मुलींच्या शाळा त्यांच्या गावांपासून दूर होत्या, वाहनाची सोय नव्हती. काही ठिकाणी अभिमान्या प्रयत्नातून एसटी बस सुरु झाल्या तर काही ठिकाणी देणगीदारांच्या मदतीतून मुलींना सायकली मिळाल्या. आता शिक्षणाचे महत्त्व मुलींनाच नव्हे तर पूर्ण कुटुंबाला समजले आहे. त्यांना बालविवाहात न अडकवता शिक्षण देऊन सक्षम करण्यसाठी पालक स्वत:च आग्रही आहेत, याचं सारं श्रेय शोभा अभियानाला देतात.' अभियानाने मला सगळ्यात मोठी गोष्टी दिली. ती म्हणजे माझ्या व्यक्तिमत्वात झालेला बदल' असं शोभा अभिमानाने सांगतात. घर आणि नोकरी यापलीकडे कधी विचार न केलेल्या शोभा या अभिमानाच्या निमित्ताने तालुकाभर हिंडल्या. मुली,

महिला, ग्रामस्थांनी बोलल्या. नवे संपर्क तयार झाले. ओळखी झाल्या. आता. तालुक्यात लोक ओळखू लागलेत. प्रशिक्षण झाले त्यातून त्यांच्या व्यवसायातील अनेक नव्या गोष्टी समजल्याचे त्या सांगतात.

अभिमानाने समृध्द केल्याची भावना त्यांचा आत्मविश्वास दुणावते !

# मुलींना घडवताना...

डॉ. राजश्री देशपांडे

सातारा जिल्ह्यातील सामाजिक कामांत नेहमीच पुढाकार असलेल्या डॉ. राजश्री देशपांडे यांच्यासाठी शिरुरमधील मुलींना आरोग्य सहायक म्हणून प्रशिक्षण देण्याचं वेगळं आव्हान होतं. पण इतर सहकारी आणि डॉक्टर मंडळी या सगळ्यांनी मिळून ते यशस्वीपणे पेललं

आरोग्य सहाय्यक होण्यासाठी म्हणून लेक लाडकी अभियानाने शिरुर तालुक्यातील मुलींसाठी प्रथमच प्रशिक्षण कार्यक्रम राबवायचं ठरवलं तेव्हा त्याआधी त्यांची एक पूर्वपरिक्षा घ्यायचं ठरलं. शिरुरमध्येच अभियानाच्या कार्यालयात ही परीक्षा झाली. अनेक मुलींना तेव्हा प्रश्नांचे अर्थही कळत नव्हते. अनेकींनी मराठीतून नीट उत्तरे लिहिता येत नव्हती. विज्ञानाचे पायाभूत ज्ञान तपासण्यासाठी घेतलेल्या त्या परिक्षेत एकूण प्रतिसाद यथातथातच होता. पण त्यातून मुलींची निवड करुन त्यांना साताऱ्यात प्रशिक्षणसाठी आणले गेले.



शिवाजी विद्यापीठाच्या लोकविकास केंद्राने तयार केलेला अभ्यासक्रम या कोर्ससाठी शिकवायचं ठरलं. प्रत्यक्ष अभ्यासक्रम सुरु झाला तेव्हा मुलींनी जिद्दीने तो पूर्ण केला. आत्तापर्यंत ती बॅचेसने हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

पहिल्या बॅमचमध्ये २०, दुसऱ्या बॅचमध्ये १५ आणि सध्या १० मुली तिसऱ्या बॅचमध्ये शिक्षण घेत आहेत. या अभ्यासक्रमासाठी जी शिक्षकांची टिीम आहे. त्यात डॉ. राजश्री देशपांडे आहेत. त्या स्वत: मानसोपचारतज्ज्ञ आहेत. अन्य शिक्षक सहाकाऱ्यांमध्ये डॉ. स्मिता कासार आणि डॉ. अंजली मणेरीकर या स्त्रीरोग तज्ज्ञ आहेत. सिव्हिल हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांनी दिलेलं सहाकर्य आणि प्रशिक्षण मुलींना उपयुक्त ठरतं. प्रा. संजीव बोंडे शरीरक्रिया शिकवतात. शिवाजी राऊत इंग्रजी घेतात. सामाजिक आरोग्य हा विषय स्वत: ॲड. वर्षा देशपांडे, तर डॉ. मेघा देशपांडे मेडिसीन हा विषय घेतात.

हा पूर्ण एक वर्षाचा कोर्स आहे. वर्षभराने परीक्षा होते. शिवाजी

विद्यापीठाचा हा कोर्स एरव्ही १५,००० रुपये फी घेऊन चालवला जातो. पण शिरुरच्या मुलींसाठी विद्यापीठाने तो मोफत चालवला आहे. मुलींकडून फक्त २०० रुपये परीक्षा फी घेतली जाते. डॉ. राजश्री प्रथम मुलींना भेटल्या तेव्हा मुलींना मूलभूत विज्ञान माहित नसलं तरी त्यांच्यातील शिकायची, समजून घेण्याची जिद्द त्यांना जाणवली. या प्रशिक्षणामुळे आपलं आयुष्य बदलून जाणार आहे, याची त्यांना जाणीव होती आणि त्यासाठी कितीही कष्ट करायची त्यांची तयारी होती. त्यामुळे सुरुवातीला थोडे अधिक कष्ट घ्यायला लागले इतकंच. मुलींना चाकोरी सोडून थोडं वेगळ्या पध्दतीने त्यांच्या आयुष्यातली उदाहरणे वापरुन शिकवावे लागणार आहे याची जाणीव झाली. त्यानुसार त्यांनी शिकवण्याचे नियोजन केले.

अभ्यासक्रमाची व्याख्याने आणि प्रात्यक्षिके एकाच वेळी सुरु झाली. त्यामुळे मुली शिकवलेल्या गोष्टी लगेचच अनुभवू शकल्या सुरुवातीला मुलींना वैद्यकीय परिभाषा खूप अवघड वाटायची, ते साहजिकच होतं. पण डॉ. राजश्री आणि इतर सहकारी शिक्षकांनी मुलींचा आत्मविश्वास वाढवला. त्यांना शब्दांचे अर्थ सांगितले. बोलीभाषेतले प्रतिशब्द सांगितले, मुलींना सोप्या भाषेत नोट्स दिल्या. थोड्या सरावाने त्याने ते समजून गेले. त्या यशस्वीपणे अभ्यासक्रम पूर्ण करू शकल्या, करत आहेत.

मुली या काळात संपूर्ण बदलून गेलेल्या त्यांनी पहिल्या. आधी आपल्याला काही भविष्य नाही असं वाटून खचलेल्या मुलींना स्वत:च्या पायावर उभे राहताना बघण्यातला आनंद डॉ. राजश्री अनुभवत आहेत. ‘ लेक लाडकी अभियान’ या मुलींना केवळ व्यावसायिक प्रशिक्षण देऊन थांबले नाही. त्यांनी मुलींना पथनाट्ये, एकांकिका यामध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले. मुलींनी स्वत:च्या तालुक्यांत, गावांत हे प्रयोग केले. त्यांचा आत्मविश्वास वाढला.

लेक लाडकी अभियानाशी जोडलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञ वैद्यकीय व्यावसायिकांकडे मुली सरावासाठी जायच्या. त्यामुळे त्यांना विविध प्रकारचे अनुभव मिळाले. रुग्ण सहाय्यक म्हणून आवश्यक ती कौशल्ये त्यांना मिळाली. आता या अभ्याक्रमाचे तिसरी बॅच सुरु आहे. आधीच्या दोन्ही बॅचेसमधील मुली आता स्वतंत्रपणे नोकरी व्यवसाय करतात. काही मुली सातारा सोडून अन्या गावांत गेल्या. कुणी होम व्हिजिटला जातात. बाकी मुली अन्य रुग्णालये, डिस्पेनसरीमध्ये काम करतात. या मुली केवळ आर्थिक दृष्ट्याच नव्हे तर निर्णय प्रक्रियेतही स्वतंत्र झाल्या ही डॉ. राजश्री यांना मोठी गोष्ट वाटते.

स्वत: डॉ. राजश्री यांच्यासाठी मुलींना शिकवणं हा मोठा अनुभव होता. या साऱ्या मुली मायेच्या भुकेल्या होत्या. घरापासून प्रथमच दूर राहिलेल्या होत्या. त्यांना अनेकदा रागवावं लागायचं. पण रागावलं तरी ते आपल्या भल्याचं आहे याची त्यांना जाणीव होत त्यांचं सर्वार्थाने मोठे होत जाताना अनुभवणं हे आनंददायी होतं, असं राजश्री सांगतात.

मुलींच्या सक्षमीकरणाचे असे प्रयोग सर्वदूर आणि अधिक व्यापक प्रमाणात व्हायला हवेत असं डॉ. राजश्री यांना वाटतं.

# व्यक्तिमत्व विकासाचा मंत्र

प्रिया चव्हाण

प्रिया राहते साताऱ्यात. तिचे तिथे ब्युटी पार्लर आहे ती पार्लर आणि व्यक्तिमत्व विकासाचे क्लासेसही घेते. नेहमीच्या पार्लर प्रशिक्षणापेक्षा वेगळे असलेले तिचं हे काम ॲड. वर्षा देशापांडे यांच्या बघण्यात होतं. शिरुरमध्ये किशोरवीयन मुलींसाठी काम सुरू करण्याचा विचार झाला तेव्हा प्रियाचं नाव आपसूकच पुढे आलं.

प्रशिक्षण देण्यासाठी साताऱ्यातून शिरुरला जावं लागणार होतं. साताऱ्यातले क्लासेस, पार्लर सोडून काही काळासाठी का होईना दूर राहावं लागणार होतं. वर्षाताई तिला म्हणाल्या, ' काम करायचं की नाही हे ठरवण्यापूर्वी एकदा बीडला येऊन मुलींशी बोल.' प्रिया त्यांच्यासोबत शिरुरला गेली. मुलींना भेटली आणि अक्षरश: हादरु गेली. आठवी, नववीतल्या मुलींची लग्न झालेली. वीस, बावीस वर्षांच्या मुलींना तीन-चार मुलं. प्रकृतीची वाट लागलेली. प्रियासाठी हा मोठा धक्का होतात. तिचं लहानपण मुंबईत गेलं. लग्नानंतर ती साताऱ्यात आली. त्यामुहे हे जग तिला नवीन होतं. मुलींना या सगळ्यातून बाहेर काढायचं तर त्यांच्या व्यक्तिमत्वात बदल घडवणं गरजेचं होतं. त्यांना संघर्षासाठी तयार करायचं होतं आणि त्यासोबत कौशल्य विकासही साधायचा होता. प्रियाने हे आव्हान स्वीकारायचं ठरवलं.




तिच्या पतीने याला पाठिंबा तर दिलाच शिवाय ते स्वत: ही तिच्यासोबत यायला तयार झाले. साताऱ्यात आर्थिक दृष्ट्या कमकुवत गटातल्या मुली प्रियाला भेटत. शिकायची इच्छा आहे. पण पैसे नाहीत. असं म्हणत. अशा वेळी अनेक मुलींना प्रियाने मोफत शिकवलं आहे. ' आयडीबाय' साठीही प्रशिक्षण दिलं आहे. सामाजिक जाणीव तिच्यात आहेच त्यामुळे एक वेगळे सामाजिक काम करण्याचा अनुभव घ्यायचा. अशी खूणगाठ बांधून सामान घेऊन प्रिया साताऱ्याहून शिरुरला पोहाचली.' लेक लाडकी अभियाना' चं तिथं ऑफिस

होतं. तिथंच राहायची सोय होती. सामान टाकलं आणि कामाला सुरुवात झाली. मुलींना शिकवायला सुरुवात केली तेव्हा लक्षात आलं की मुली फक्त नावालाच अमुक एवढी इयत्ता शिक्षण झालं असे म्हणतात. प्रत्यक्षात अनेकींना साधी साधी वाक्येही लिहिता येत नाहीत. शाळांमध्ये त्या किती जात असतील. हे ध्यानात येत होतं. त्यामुळे मुलींना ब्युटी पार्लर सोबत आणखीही बरेच धडे द्यावे लागणार होते, हे स्पष्ट झालं.

पहिली बॅच सुरु झाली पण मुलींचा प्रतिसाद अगदीच वाईट होता. चार–पाच मुलीच फक्त हजर होत्या. अभियानाच्या कार्यकर्त्यांनी गावोगावी निरोप पाठवले. फोन केले, अगदी रिक्षाही पाठवून मुलींना बोलावून आणले. क्लास कसा होईल, अशी क्षणभर काळजी वाटली. पण एकदा प्रत्यक्ष शिकवणं सुरु झालं आणि मुलींचा प्रतिसाद वाढला. तब्बल ४० मुली आल्या. नंतरच्या बॅचेसही आधीच फुल्ल झाल्या. इतकी गर्दी व्हायची की मुलींना जागा पुरायची नाही. सकाळी ९ वाजता प्रिया क्लास सुरु करायची. मध्ये जेवणाची सुट्टी. संध्याकाळी सहा–सातपर्यंत क्लास सुरु राहायचा. मुली शेवटच्या बसने घरी निघायच्या किंवा कधी एखादा महत्त्वाचा भाग शिकवायचा असेल तर अभियानाच्या वतीने त्यांना रिक्षाने घरी सोडलं जायचं. मुली येताना दोन दोन डबे घेऊन याचच्या मुली शिकण्यात इतक्या रंगून जात की अक्षरश: जबरदस्तीने घरी पाठवावं लागायचं. दोनेक वेळा तर असं झालं की मुली अजून घरी का आल्या नाहीत, हे बघायला पालक क्लासपर्यंत आले होते.

प्रिया मुलींना बॅच सुरु झाली की अधी तीन चार दिवस व्यक्तिमत्व विकास, मग दोन–तीन दिवस स्वत:चे शरीर, स्वच्छता, आरोग्य, आहार याबद्दल सांगायची. नंतर प्रत्यक्ष पार्लरचं ट्रेनिंग सुरु व्हायचं. हेही थेअरी आणि प्रॅक्टिकल अशा दोन भागात व्हायचं. प्रियाची स्वत:ची एक पध्दत आहे. पार्लर शिकण्याआधी त्वचा, त्वचेच प्रकार, पोषण, केस, केसांचे आरोग्य, केसांची निगा हे सगळं माहित असायला हवं. असं ती मानते. त्यामुळे प्रत्यक्ष प्रॅक्टिकलकडे जाण्याआधी ती हे सगळं शिकवतं. शिरुरमध्येही तिने हे घेतलं. त्यामुळे मुलींचं फक्त वरवर नव्हते, तर अगदी सखोल माहितीसह प्रशिक्षण झालं. किशोरवयीन मुलींच्या तीन बॅचेस तिने घेतल्या. त्यानंतर थोड्या मोठ्या मुलींनीही आग्रह केल्यावर प्रियाने त्यांसाठी चौथी बॅचही घेतली.

‘ लेक लाडकी अभियाना’त आल्यावर मुलींच्या वागण्यातला बदल तिथल्या तिथे जाणवून देणाऱ्या दोन घटना घडल्या. एका मुलीला घरी पाहुणे बघायला येणार होते. ती सरळ प्रियाच्या क्लासमध्ये येऊन बसली. तिचे पालक न्यायला आले तर तिने यायला साफ नकार दिला. आणखी दोघींची

लग्न ठरली होती. त्यांनी घरी स्पष्ट सांगू टाकलं. आमचं शिक्षण पूर्ण झाल्याशिवाय लग्न करणार नाही. हे बदल प्रियाला खूप महत्त्वाचे वाटतात.

शिरुरचा अनुभव प्रियाला स्वत:ला खूप काही शिकवणारा ठरला. आपल्याच शहरापासून सात-आठ तासांच्या अंतरावर पुरोगामी म्हणवल्या जाणाऱ्या राज्यात सर्रास बालविवाह होतात, हे भयंकर वास्तव तिच्या समोर आलं ' शाळेचे रस्ते ' इतके धोकादायक असू शकतात हे तिने शिरुरच्या वास्तव्यात प्रत्यक्ष अनुभवले. एकदा शाळेतून शेतातल्या वाटेने घरी जाणाऱ्या मुलीवर बलात्कार झाल्याची खबर आली तेव्हा शिरुरहून साताऱ्याकडे निघालेल्या वर्षाताई अर्ध्या रस्त्यातून परत आल्या आणि त्यांनी त्या मुलीला मदत केल्याचं ती सांगते.

पार्लरचं प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना प्रमाणपत्र दिलं गेलं. यामुळे सरकारी योजनेतून कर्ज घेऊन त्या स्वत:चा व्यवसाय सुरु करु शकतील काही जणींनी छोट्या प्रमाणात काम सुरुही केलं आहे. मुली पार्लरचं कौशल्य तर शिकल्याच. पण प्रत्यक्ष जगण्याच्या लढाईत स्वत:ला कसं तयार करायचं, याचे धडे त्यांना प्रियाच्या क्लासमधून मिळाले. शिरुरमधल्या मुलींच्या आत्मविश्वासपूर्ण आणि आरोग्यपूर्ण आयुष्यासाठी थोडा हातभार लावला आला. याचं समाधान मोठं असल्याचं प्रिया सांगते.

# स्वावलंबनाचा किबोर्ड

अमोल ढाकणे

संगणक मुलींसाठी शाळेत दुरुन बघण्याची वस्तू होती. अमोल यांनी मुलींची संगणकाची दोस्ती करुन दिली. आता मुली तो आत्मविश्वासाने हाताळतातच. शिवाय काही जणी त्यातून अर्थार्जनही करु लागल्या आहेत.

अमोल ढाकणे यांच्या आई शोभा लेक लाडकी अभियानाशी जोडलेल्या होत्या. त्यामुळे अमोल यांना अभियानाविषयी माहिती होती. अभियानाच्या वतीने शिरुर तालुक्यात किशोरवयीन मुलींसाठी कौशल्य विकास कार्यक्रम घ्यायचे ठरले तेव्हा त्यात एक संगणक प्रशिक्षण असाही कोर्स होता. त्यावेळी अमोर बीडमध्ये काम करत होते. तालुक्यातील मुलींची गरज आणि कामाचं महत्तव ध्यानात घेऊन त्यांनी शिरुरला येऊन अभियानाच्या कामाशी जोडून घ्यायचं ठरवलं. संगणक प्रशिक्षण तालुक्यातील मुलींच्या दृष्टीने खूप महिने ऊसतोड कामगार म्हणून स्थलांतर करतात. संगणक शाळेत सक्तीचे केले तरी शाळांमध्ये या शिक्षणाची अवस्था वाईट आहे. अनेक ठिकाणी संगणक बिघडलेले असतात. कधी प्रशिक्षक नसतो. कधी विजेचा प्रश्न तर कधी आणखी काही. बऱ्या आर्थिक स्थितीतली मुले खासगी क्लास लावू शकतात. या मुलींना ते शक्य नसतं. बाहेर कोणत्याही क्षेत्रात गेलात तरी संगणकाचे थोडेफार ज्ञान गरजेचे असते. त्यामुळे हे प्रशिक्षण घेऊन मुलींना त्या क्षेत्रातले मूलभूत ज्ञान मिळावे आणि त्यांनी रोजगारासाठी तयार व्हावे असा हेतू होता.



मुली आल्या तेव्हा त्यांना संगणक सुरु कसा करायचा इथपासून शिकवावे लागले. पण मुली जिद्दीने शिकल्या. संगणकावर टायपिंग शिकवण्याला प्राधान्य दिले. आठवड्यातले काही दिवस फोटोशॉप शिकवण्यासाठी वापरले. यंत्र म्हटले की मनात उगाच एक भीती असते. ग्रामीण भागात तर घरात अशी यंत्रे नसल्याने ती असतेच. मुलींना असे दडपण येऊ नये म्हणून अमोल यांनी मुलींसाठी एक संगणक उघडूनच ठेवला होता. त्यातल्या भागांची माहिती दिली. त्यांनी मुलींना सॉफ्टवेअर, हार्डवेअर यातला फरक

समजावला. लहान मुलांसमोर एखादं नव खेळणं ठेवल्यावर जसा आनंद होतो, तशा मुली संगणक हाताळताना खुश व्हायच्या. जादूच्या पेटीतून वेगवेगळ्या गोष्टी बाहेर पडाव्यात तसं त्यांना नवनव्या गोष्टी शिकताना व्हायचं.

मुलींना फोटोशॉप शिकताना विशेष मजा आली. अमोल यांनीही स्थानिक गरजांचा विचार करुन त्यांना ते शिकायला प्रोत्साहन दिलं. बीडमध्ये सतत राजकीय घडामोडी सुरु असतात. त्यामुळे फ्लेक्स, बोर्ड लावणं हे सतत सुरु असतं. मुलींच्या फोटोशॉपच्या ज्ञानाचा उपयोग त्यांना होऊ शकेल असा विचार त्यामागे होता.

हा कोर्स मुलींनी उत्साहाने पूर्ण केला. तो संपला तरी नंतर प्रॅक्टिसही महत्त्वाची असते. घरात हाता-तोंडाची जेमतेम गाठ पडत असताना कम्प्युटर कुठून असणार ? मुली नंतर हवे तेव्हा क्लामध्ये यायच्या, सराव करायच्या. आताही त्या येतात. क्लासमध्ये पाणी वगैरे भरुन ठेवलेलं असतं. कधी त्याची बस यायला वेळ असतो. कधी डबा खायचा असतो. क्लास मुलींना आपला वाटतो. अमोल यांनी प्रशिक्षण दिलेल्या मुलींपैकी दोघी शिरुरमध्येच एका डीटीपी केंद्रात काम करतात. थोडेफार पैसेही मिळवतात. या सगळ्याच मुली अद्याप शिक्षण घेताहेत. पण शिकता शिकताही काम करुन थोडेफार पैसे मिळवता येतात हा आत्मविश्वास त्यांना मिळाला आहे. स्वावलंबनाचा किबोर्ड त्यांच्या हाती आलाय.

# परिवर्तनाचा वाहक

अयाज इसाक शेख (बाबू)

शिरुरमध्ये रिक्षा चालवून उदरनिर्वाह करणाऱ्या बाबूला लेक लाडकी अभियानासाठी रिक्षा चालवण्याचे काम मिळाले बाबू अभियानाचे लघुपट दाखवत, मुलींना सुरक्षितपणे त्यांच्या घरी पोहाचवत रिक्षाचालकाचा कार्यकर्ता कधी झाला, ते त्यालाही कळले नाही.

बाबूची रिक्षा शिरुरमधली एकमेव. मुलांना शळेत सोडायला, रुग्णांना दवाखान्यात न्यायला किंवा पाहुण्यांना बस स्थानकावर सोडायला शिरुरमधल्या लोकांना बाबूच्या रिक्षाशिवाय पर्याय नाही. रिक्षा आहे दुसऱ्याच एकाच्या मालकीची, पण बाबू ती अर्ध्या वाटणीत चालवायचा.

अभियानाशी त्याचा संपर्क आला तो ठोंबरे सिस्टर यांच्यामुळे त्यांच्या कुटुंबातल्या मुलांना बाबू शाळेत सोडायचा. त्याचा प्रामाणिकपणा आणि सुरक्षित गाडी चालवण्याचं कौशल्य त्यांनी पाहिलेलं होतं. त्यामुळे अभियानाच्या कामादरम्यान तालुक्यात प्रवास करण्यासाठी एक वाहन हवे आहे, असे कळले तेव्हा आपसूकच बाबूचे नाव समोर आहे. शिरुरमध्ये अभियानाने प्रामुख्याने बालविवाहांचा प्रश्न हाती घेतला होता. लोकांमध्ये जागरुकता निर्माण व्हावी म्हणून अभियानानेच तयार केलेला 'दफ्तर' हा लघुपट दाखवण्याची जबाबदारी बाबूवर टाकण्यात आली. एका मुलीचे वडिलांच्या जबरदस्तीमळे तिच्यापेक्षा वयाने कितीरी मोठ्या असलेल्या माणसाशी लग्न लावण्यात येते. पण नंतर तिची आजी तिच्यामागे खंबीरपणे उभी राहते आणि मुलीची त्यातून सुटका होऊन तिच्या हाती पुन्हा शाळेचे दफ्तर येते, अशी त्या लघुपटाची गोष्ट आहे.



बाबूला एका पेन ड्राईव्हमध्ये तो लघुपट दिलेला होता. रिक्षात सोबत एक टिव्ही असायचा. शिरुरमध्ये विजेचा लपंडाव सुरु असतो. म्हणून एक इन्व्हर्टरही सोबत दिला होतात. बाबू रिक्षा घेऊन गावोगावी जायचा. शक्यतो संध्याकाळची वेळ निवडलेली असायची. गावातले लोक शेतातून कामावरून

घरी आलेले असायचे. मुलामुलींची शाळा सुटलेली असायची. गावातलं देऊळ किंवा ग्रामपंचायतीच्या जागेत बाबू फिल्म दाखवायचा. लोकांना ती आपल्या घरातली गोष्ट वाटायची. बायका, मुलींचे हुंदके ऐकू यायचे. फिल्म संपली की बाबू एक रजिस्टर फिरवायचा. त्यात लोकांकडून अभिप्राय लिहून घ्यायचा. लोक भरभरून लिहायचे. त्यातल्या आजीचं काम स्वत: वर्षा देशपांडे यांनी केलं आहे. ही आजी लोकांच्या खास पसंतीस उतरली होती. तिच्याबद्दल लोक हटकून लिहायचे.

नंतर ' दफ्तर' शिवाय बाबूने अभियानाचे आणखीही लघुपट दाखववले. तालुक्यातल्या सगळ्या शाळांध्येही बाबू गेला.प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील मुला-मुलींनाही लघुपट आवडले. मुलं त्यावर, त्यात मांडलेल्या प्रश्नांवर व्यक्त होऊ लागली. सुरुवातीला बाबू जेव्हा रिक्षा घेऊन गावात जायचा तेव्हा लोकांच्या मनात अनेक शंका असायच्या. लोक जरा संशयाने बघायचे, प्रश्न विचारायचे. लेक लाडकी अभियानाबद्दल. त्यांच्या कामाबद्दल त्यांना महिती हवी असायची. बाबू जमेल तेवढे त्यांना सांगायचा. काही गावांत उलट स्थितीही असायची. लोक आनंदाने स्वागत करायचे. काही गावांत बाबू दोन वेळाही गेला. सुरुवातीला आपण करतोय ते योग्य काम आहे ना, लोकांचा विरोध असेल तर पुढे यातून खरेच काही साध्य होणार आहे का, असे प्रश्न बाबूलाही पडायचे. पण जसजसे काम वाढू लागले तसतसा मुलींचा प्रतिसाद वाढू लागला. बालविवाह ही आपल्या भागातली मोठी समस्या आहे. हे बाबूलाही मनापासून पटले आणि मग तोही केवळ रिक्षाचालक राहिला नाही तर अभियानाचा कार्यकर्ता झाला.

केवळ लघुपट दाखवून बाबूचं काम संपलं नाही. शिरुर तालुक्याच्या अंतर्गत भागात वाहतुकीची सोय नीटशी नाही. अभियानाने जेव्हा वेगवेगळे कौशल्य अभ्यासक्रम सुरु केले. मुली त्यासाठी शिरुरला यायच्या कधी कधी त्यांची शेवटची बस निघून जायची मग बाबूची रिक्षा त्यांना घरापर्यंत सुरक्षित पोहोचवून यायची.

अभियानातल्या मुलींनी बालविवाह आणि अन्य समस्यांविषयी पथनाट्ये बसवली होती. तालुक्यातल्या गावागावांत या मुली गेल्या. त्यांनी या पथनाट्याचे तिथे दणक्यात प्रयोग केले. या मुलींना घेऊन जाऊन पुन्हा सुरक्षित आणून पोहोचवण्यासाठी बाबूची रिक्षा सज्ज असायची.

अभियानाच्या निमित्ताने तालुक्याच्या कानाकोपऱ्यात बाबू गेला. अगदी दुर्गम भागतल्या वाड्या वस्त्यांवरही त्याची रिक्षा पोहोचली. खड्ड्यांनी भरलेल्या त्या एकट्या रस्त्यावरुन रिक्षा चालवणं हि कसोटीच होती. पण

मुलींसह हा प्रवास सुखरुप पार पडला. बाबू आता स्वत:ची रिक्षा घेण्याचं स्वप्न बघतोय. त्यासाठी त्याची धडपड सुरु आहे. शिरुमधल्या अभियानाच्या कामात बाबू नूसता रिक्षाचालक नव्हे तर एका मोठ्या परिवर्तनाचा वाहक ठरला आहे.

# आरोग्य ते सेवा ते समाजकार्य

शंकुतला ठोंबरे

आरोग्य विभागात प्रदीर्घ सेवा करुन त्या निवृत्त झाल्या. पण निवृत्तीनंतर त्या स्वस्थ बसल्या नाहीत आपले ज्ञान आणि दांडगा जनसंपर्क याचा उपयोग करत किशोरींच्या आयुष्याला नवं वळण देणाऱ्या प्रकल्पामध्ये त्या शिरुर तालुक्याच्या मुख्य समन्वयक झाल्या आणि हा प्रकल्प यशस्वी करण्यात मोलाचा सहभाग दिला.

त्यांच नाव शकुंतला ठोंबरे. पण शिरुर तालुक्यात त्या प्रसिध्द आहेत ते ठोंबरे सिस्टर या नावाने. २०१० -११ मध्ये जणगणनेचा अहवाल प्रसिध्द झाला आणि त्यात जाहीर झालेल्या आकडेवारीमुळे शिरुर तालुका राष्ट्रीय नकाशावार आला. ते एका नकारात्मक गोष्टीसाठी ! तालुक्यातील ० ते ६ वयोगटातले लिंगगुणोत्तर धोकादायक पातळीच्या खाली आलं होतं. ॲड. वर्षा देशपांडे त्यावेळी शिरुरला सातत्याने भेट देत होत्या. आरोग्य विभागाची सतत संपर्कात होत्या. जनजागृती, पीसीपीएनडीटी कायद्याची अंमलबजावणी यावर काम सुरु होते. बीड शहर, परळी आणि परिसरात तनी काही स्टिंग ऑपरेशन केली होती आणि बडे डॉक्टर गजाआड केले होते. त्यामुळे त्यांच्या नावाची बीड जिल्ह्यात चांगलीच दहशत होती. त्यावेळी ठोंबरे सिस्टर शिरुर तालुक्यात आरोग्य विभागात बीएनओ म्हणून काम करत होत्या. या दरम्यान लेक लाडकी अभियानाने मुलींचे तालुक्यातील लिंग गुणोत्तर कमी होण्याची कारणे शोधण्यासाठी तालुक्यात एक सर्वेक्षण केले होते. आरोग्य विभागाच्या वतीने तेव्हा सिस्टर या कामात सहकार्य करत होत्या. हा त्यांचा अभियानाशी असलेला पहिला संपर्क. त्यानंतर आरोग्य विभाग, लेक लाडकी अभियान या सगळ्यांच्या प्रयत्नांमधून शिरुर तालुक्यातील मुलींचे लिंग गुणोत्तर वाढले ते आता जवळपास सामान्य पातळीवर आले आह !



२०१६ मध्ये 'युएनएफपीए' च्या सहकार्याक़्ने शिरुर तालुक्यातील

बालविवाहांच्या प्रश्नावर काम करण्याचे ठरले. त्यावेळी सिस्टर आरोग्य विभागाच्या सेवतेतून नुकत्याच निवृत्त झाल्या होत्या. हाताशी वेळ होता आणि समाजासाठी काही तरी करण्याची तळमळ, सिस्टर अभियानासोबत जोडल्या गेल्या आणि त्यांच्यावर शिरुर तालुक्याच्या मुख्य समन्वयक म्हणून जबाबदारी आली.

शिरुर हा दुष्काळी तालुका, शेती मुख्यत: जिरायती. तालुक्यात जलप्रकल्प नाहीत. उद्योग नाहीत. पाऊस अत्यंत कमी. त्यामुळे दुष्काळ पाचवीला पुजलेला. तालुक्यातले लोक पोट भरायला साखर कारखान्यांच्या परिसरात ऊस तोडायला जातात. सहा महिने घर, गावांपासून दूर. शाळकरी मुलांच्या शिणिाचे हाल. त्यात मुली असतील तर घरी एकटे ठेवणे किंवा ऊसतोडीला सोबत घेऊन जाणे दोन्ही असुरक्षित. वयात आल्या की मुलींची लग्न सर्सास लावून दिली जातात. त्यामुळे तालुक्यात बालविवाहांचं प्रमाण प्रचंड आहे. नेमक्या याच समस्येवर अभियानासोबत काम करायचे होते इतकी वर्षे आरोग्य क्षेत्रात काम केल्यामुळे बालविवाहांचे मुलींच्या आरोग्यावर किती गंभीर परिणाम होतात. हे सिस्टर जवळून बघत होत्या. लैगिंक शोषण आणि हिंचाराचा मुद्दाही सोबत होताच. अभियानासोबत काम करताना या सगळ्याचा साकल्याने विचार करायचा होता.

नोकरीतील १० ते ११ वर्षे एवढा दिर्घकाळ सिस्टर शिरुर तालुक्यात काम करत होत्या. कामामुळे तालुक्याच्या कानाकोपऱ्यात त्यांचा प्रवास झाला आहे. प्रत्येक गावात त्यांचा संपर्क आहे. लोकांना मदत करण्याचा त्यांच्या अडीअडचणीला धावून जाण्याचा स्वभाव असल्याने लोकांमध्ये त्यांच्याविषयीचा जिव्हाळा निवृत्तीनंतरही कायम राहिला आहे.

'लेक लाडकी अभियाना'ने शिरुर तालुक्यातील बालविवाहांचा प्रश्न हाती घेतला तेव्हा तालुक्यातील अशा सेविकांना या अभियानात सामील करुन घेण्याचे ठरले. या निर्णयामुळे ठोंबरे सिस्टर यांचा उत्साह वाढला. कारण अशा सेविका राज्या सर्वप्रथम सेवेत आल्या तेव्हा २०१६ मध्ये तालुक्यातील अशा सेविकांना ३३ दिवसांचे प्रशिक्षण त्यांनी दिले होते. त्यातल्या बऱ्याच जणी आताही सेवेत असल्याने त्याच्यासोबतचे काम अधिक सोपं होणार होतं.

शिरुर तालुक्यात एकूण १२८ अशा सेविका आहेत. त्यापैकी १२० सेविकांनी या प्रकल्पात सहभागी व्हायचे ठरवले. हा प्रकल्प मुख्यत: किशोरीसाठी होता. तालुक्यात एकूण ६९४७ किशोरी होत्या त्यापैकी २५०० मुलींना यात सहभागी करुन घ्यायचे ठरले. याद्या तयार झाल्या. ९६ गावांच्या

लोकसंख्येनुसार गट तयार झाले. १२८ गटांमध्ये मुली विभागल्या गेल्या आशांचे प्रशिक्षण झाले आणि तालुक्यात प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली.

बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती आणि कायद्याचा बडगा अशा दोन्ही पातळ्यांवर काम करावे लागले. स्थानिक लोकांशी जुना संपर्क तर होताच. शिवाय बऱ्याच गावांमध्ये जवळचे,दूरचे नातेवाइकही होते. बालविवाह ठरल्याची कुणकुण लागताच गावातली आशा, एखादी मुलगी किंवा एखाद सजग व्यक्ती फोन करायची. मग मुलीच्या पालकांना नातेवाईकांना आधी प्रेमाने समजावणे, नंतर कायद्याचा धाक दाखवून जरा कठोरपणे सांगणे आणि तरीही नाही एकेले तर कायदेशीर कारवाई करणे अशा पातळ्यांवर काम सुरु होते. यात कधी कधी प्रचंड गोची व्हायची स्थानिक असल्याने १० - १५ च्या गटाने लोक थेट घरी यायचे. 'तुम्हाला इथले प्रश्न माहित आहेत, आम्हाला मुलींची लग्न का लावून द्यावी लागतात, याची कल्पना आहे, तरीही तुम्ही विरोध का करता ?' असे म्हणत दबाव आणायचे. कधी बाचाबाची व्हायची. तरीही ऐकत नाही असे दिसलं की दमदाटीही व्हायची. अशा वेळी स्वत:साठी नाही पण कुटूंबासाठी भीती वाटायाची. काही वेळा तर रात्रीच्या वेळी घरावर दगड पडायचे. रात्र जागून काढावी लागायची. एकीकडे लोकांची समजूत काढणं, दुसरीकडे बालविवाह कसे चूकी आहेत हे पटवून देणे आणि तिसरीकडे मुलींना कौशल्य विकास कार्यक्रम उपलब्ध करुन देत शाळेत जाण्यासाठी सुरक्षित पर्याय देणं अशी तिहेरी लढाई होती. सिस्टर अभियानाच्या सोबत त्या परीक्षेत यशस्वी झाल्या. अभियानाच्या माध्यमातून त्यांनी तालुक्यात पालकांनी ठरवलेले ४० ते ४५ बालविवाह समुपदेशन, चर्चा या माध्यमातून थांबवले त्यासाठी पालकांना पुन्हापुन्हा भेटावं लागलं. स्थनिक नेत्यांना सांगून दबाव टाकावा लागला. प्रसंगी कायद्याचा दंडुका हाती घ्यावा लागला. २० ते २५ बालविवाहांच्या प्रकरणांमध्ये अप्रत्यक्षपणे हस्तक्षेप करावा लागला. वेळप्रसंगी पोलिसांचीही मदत घ्यावी लागली.

हे सगळे करताना कुठेही कटुता येणार नाही. असा त्यांचा प्रयत्न असायचा. अनेकदा ते प्रयत्न यशस्वी व्हायचे. कधी कधी लोकांचा वाईटपणा घ्यावा लागायाचा.

या दरम्यान त्या एका राजकीय पक्षाशीही जोडलेल्या होत्या. पण अभिमानाच्या कामामुळे लोक दूर जातील असा आक्षेप घेत त्यांना पदावरून दूर केलं गेलं. मुलींच्या आयुश्याला सकारात्मक वळण देण्याचं समाधान मोठं होतं. त्यामुळे या गोष्टी त्यांनी फार मनावर घेतलेल्या नाहीत.

मुलीही माणूस आहेत आणि त्यांनाही शिकण्याचा, आरोग्याचा आणि स्वत:च्या आयुष्याचे निर्णय घेण्याचा हक्क आहे, हे विचार अभियानाच्या माध्यमातून शिरुरमध्ये पहिल्यांदा रुजले. त्या रुजवणीत महत्वाची भूमिका बजावता आली याचा मनापासून आनंद असल्याचं सिस्टर सांगतात.

# आरोग्यरक्षक आणि समाजसेवकही

डॉ. राजेश तांदळे

तालुक्याचे आरोग्य अधिकारी म्हणून काम करताना डॉक्टरांना तालुक्यातील सामाजिक वास्तवाची चांगलीच जाणीव होती. त्यामुळे किशोरींसाठीच्या प्रकल्पांत त्यांनी संपूर्ण सहकार्य केलंच शिवाय स्वत: जातीने सहभागही नोंदवला. प्रकल्प यशस्वी होण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

ॲड. वर्षा देशपांडे यांच्याशी डॉ. राजेश तांदळे यांचा संपर्क आला तो थोड्या वेगळ्या परिस्थितीत. २०१० च्या जनणगणनेचे आकडे जाहीर झाले होते बीडमधील शिरुर हा मुलींचे लिंग गुणोत्तर सर्वाधिक खालावलेला तालुका म्हणून समोर आला होता. डॉ. तांदळे तेव्हाही शिरुरचे आरोग्य अधिकारी होते. ते जेव्हा बीडला आरोग्य अधिकाऱ्यांच्या शासकीय बैठकींना जात, तेव्हा शिरुरचा खालावलेल्या लिंगगुणोत्तराबाबत उल्लेख होई. डॉक्टरांना ते अत्यंत अपमानास्पट वाटे. वर्षाताईंनीही याच मुद्द्यावर तालुक्यात काम सुरु केले होतं. लिंगनिवड चाचण्या आणि त्यानंतर होणारे गर्भपात यात आरोग्य विभाग तर कुठे जबाबदार नाही ना याबाबत त्यांनी तालुक्यात काही ठिकाणी चौकशीही केली होती. थोड्या साशंकतेनेच त्या डॉ. तांदळे यांना भेटल्या होत्या. मात्र, या भेटीतून बऱ्याच गोष्टी स्पष्ट झाल्या. वर्षाताईंसमोर एक संवेदनशील व्यक्ती या भेटीतून उलगडली. डॉ. तांदळे यांनी त्या आधीच स्वत:च तालुक्यातील मुलींचे लिंग गुणोत्तर वाढवण्याचा मुद्दा मनावर घेतला होता. त्यात त्यांना ' लेक लाडकी अभियाना'ची साथ मिळाली.




डॉ. तांदळे यांनी याबाबत थोडा अभ्यासही केला. तालुक्यातील बहुतेक लोक ऊसतोडसाठी स्थलांतर करतात. लोक शिरुरच्या बाहेर जाऊन लिंगनिदान चाचण्या आणि गर्भपात करत असणार, हे स्पष्ट होते. या दरम्यान लेक लाडकी अभियानाने बीड जिल्ह्यात काही स्टिंग ऑपरेशन केली. त्यातून अनेक नामवंत डॉक्टर

गजाआड झाले. त्यामुळे इतरांनी आपले उद्योग बंद केले. त्याच दरम्यान सरकारने गर्भवतींचे ट्रॅकिंग (एएनसी) ठेवणे सुरु केले. त्यामुळे परिस्थिती हाताळणे सोपे झाले. यानंतर डॉ. तांदळे यांनी शिरुर तालुक्यातील कोणाही गर्भवतीने गर्भपात केल्याचे समोर आले तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित वैद्यकीय व्यवसायिकावर राहील आणि याचे गंभरपणे रिपोर्टिंग केले जाईल. असे खासगी वैद्यकीय व्यावसायिकांना बजावले तशी पत्रेच पाठवले. त्यातून योग्य तो बोध घेतला गेला. लोकांच्या विचारांमध्येही बदल झाला. कायद्याचा धाक, जनजागृती यामुळे गेल्या काही वर्षांत मुलींचे लिंगगुणोत्तर सातत्याने वाढते आहे. सध्या ते हजार मुलग्यांमागे ९२६ मुली एवढे आहे. हा बदल घडवण्यात डॉ. तांदळे यांचा महत्त्वाचा सहभाग राहिला आहे. यासाठी डॉक्टरांनी गावागावात जाऊन बैठका घेतल्या. लोकांचं मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. कुटुंबात लागोपाठ मुलीच असतील तर अशा कुटुंबांना समजावणं, मुली मुलांपेक्षा कुठेही कमी नसतात. हे पटवून देणं हे काम सातत्याने करावं लागलं.

‘ लेक लाडकी अभियाना’शी डॉक्टरांचा पुन्हा संपर्क आला तो किशोरवयीन मुलींसाठी त्यांनी पुन्हा काम सुरु केले तेव्हा. केवळ कायद्याचा बडगा दाखवून उपयोग नव्हता. मानसिकता बदलावी लागणार होती. तालुक्यात काम उभं करण्यासाठी एक मजबूत साखळी तयार करण्याची गरज होती. अभियानाने तालुक्यातील अशा सेविकांची मदत घ्यायचे ठरवले. त्यांना काही मानधनही द्यायचे ठरले. त्यामुळे बहुतांश अशा सेविका यासाठी तयार झाल्या. गावात चांगला संपर्क असल्याने त्यांच्याकडून काम करुन घेणे सोपे होणार होते. समुपवदेशन, आरोग्य, प्रशिक्षण यासाठीही त्यांचा उपयोग झाला. बालविवाह रोखण्यासाठी त्यांची अप्रत्यक्ष मदत झाली. या प्रक्रियेत डॉक्टरांनी मोठे सहकार्य दिले.

तालुक्यात बालविवाहांचं प्रमाण मोठं आहे. या मुलींना लग्नानंतर येणारे प्रश्न डॉक्टर अनेक वर्षे जवळून बघतात. १८ वर्षांच्या आत लग्न झालं की मुलीची वाढ खुंटली. हाडं ठिसूळ होतत. कमी वजनाची, अपुऱ्या दिवसांची, कुपोषित, व्यंग असलेली मुलं जन्माला येतात. ॲनेमिया तर ठाण मांडून बसतो. पण तोवर खूप उशीर णालेला असतो. लैगिंक अरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. हे सगळं टाळायचं असेल तर बालविवाह रोखण्याची गरज होती. डॉक्टर खंबीरपणे अभियानासोबत राहिले. जनजागृती प्रशिक्षण कार्यक्रम यात साथ दिली.

खरं तर डॉक्टर स्वत: एका सुखवस्तु, सुशिक्षित कुटुंबाची पार्श्वभूमी

असलेले. एमबीबीएसची पदवी घेतल्यानंतर कुठेही खासगी प्रॅक्टिस केली असती तर भरपूर पैसा कमावता आला असता. पण त्यांनी सरकारी नोकरी स्वीकारली. शिरुरसारख्या दुष्काळी, ऊसतोड कामगारांच्या तालुक्यात सलग नऊ वर्षे काम करताना त्याना या परिसरातील गरिबी तर दिसलीच पण त्या अनुषंगाने येणारे सामाजिक प्रश्नही जाणवले. आजरपण जमेल तेवढे अंगावर काढणारे लोक अगदी नाईलाज झाला तर डॉक्टरकडे जातात. इतक्या उशिरा का आलात विचारले तर कर्ज काढून किंवा दावणीचे जनावर विकून त्यांनी पैसा उभा केलेला असतो. त्या महत्त्वाचा वेळ वाया गेलेला असतो. अशा लोकांसाठी आपले ज्ञान आणि सेवा देणं डॉक्टरांना गरजेचं वाटतं. याच जाणीवेतून त्यांनी शिरुरमध्ये शिक्षणसंस्था काढली आहे. आरोग्य क्षेत्राखेरीज इतर सामाजिक क्षेत्रांतही डॉक्टर सक्रिय आहेत. ही वाटचाल अशीच पुढे सुरु ठेवण्याचा त्यांचा मानस आहे.

# संपर्काची साखळी

रुपाली मुळे

लेक लाडकी अभियानाचे कार्यालय आहे साताऱ्यात आणि प्रकल्प होता बीड जिल्ह्यातील शिरुर तालुक्यात प्रकल्पाच्या संपर्क प्रमुख म्हणून रुपाली मुळे यांनी हे अंतर कमी करण्यात यश मिळवलं !

शिरुर तालुक्यात ५३ ग्रामपंचायती आणि ९६ गावं आहेत. त्यातली अनेक दुर्गम. या सर्व गावांत किशोरवयीन मुलींसाठी प्रकल्प राबवायचा होता. आरोग्य विभागाच्या मदतीने मुलींच्या याद्या आधीच हातात होत्या. त्यामुळे कोणत्या गावात किती मुली आहेत ही माहिती हाताशी होती. प्रत्यक्ष काम सुरु करण्यापूर्वी या सगळ्यांना एकत्र भेटावं म्हणून एक मेळावा घ्यायचं ठरलं. रुपा मुळे या प्रकल्पात संपर्क प्रमुख म्हणून काम करणार होत्या. या याद्या त्यांच्या हाती पोहोचल्या. आशा सेविका या संपूर्ण प्रकल्पाच्या कणा होत्या. त्यांच्या माध्यमातून मुलींपर्यंत पोहोचायचं होतं. मुलींचे फोन नंबर आणि पत्ते त्या-त्या गावातल्या आशा सेविकांकडून मिळाले. रुपा ताईंना त्यापूर्वी आशा सेविकांची एक बैठक घेतली आणि त्यांची प्रकल्पातली भूमिका समजावून दिली. आशा सेविकांचं पहिलं काम होतं गावात किशोरीचे गट तयार करणं. मुली उत्साहाने एकत्र आल्या. त्यांना आपल्याला गटांना कल्पकतेनं नावं ठरवली.



किशोरी मेळाव्यासाठी रुपा ताईंनी मुलींना फोन केले. कुणीतरी आपल्याला फोन करुन कार्यक्रमाला निमंत्रित करतेय ही कल्पनाच मुलींना सुखावून गेल्याचं रुपाताई सांगतात. या मेळाव्यासाठी सगळी तयारी साताऱ्याहून केली गेली होती. लागणारं सहित्य भरुन गाड्या पोहोचल्या होत्या. मुलींना फोन तर केला होते. पण प्रत्यक्षात काय होणार ही धाकधूक होतीच. कार्यक्रमाची वेळ झाली. भला मोठा मंडप घातला होता. मुलींच्या संख्येच्या हिशेबाने अल्पोहार आणून ठेवला होता. सुरुवातीला अगदीच चार-दोने मुली मंडपात दिसत होत्या. रुपाताईंचा धीर सुटू लागला होता. पण थोड्याच वेळात मुली गटागटाने येऊ लागल्या. त्या इतक्या संख्येने आल्या

की चक्क मंडप अपुरा पडला. मेळावा यशस्वी झाला. संपर्काची पहिलीच परीक्षा रुपाताई उत्तीर्ण झाल्या होत्या. सुरुवात तर दणक्यात झाली होती.

पण खरी परीक्षा अजून सुरु व्हायची होती. पुढच्या मीटिंगसाठी आशाताईंना फोन करायची वेळ आली तेव्हा ते फोन कुणी तरी पुरुष उचलत होते. पती, सासरे किंवा मुलांकडे हे फोन होते. ही मंडळी कुठे तरी शेतात, कामावर नाही तर कॉलेजात असत. मग निरोप द्या म्हणून विनवण्या कसाबसा निरोप त्यांना मिळायचा आणि त्या पोहोचायच्या ! दुसरी अडचण तर याहून मोठी होती. एक मीटिंग होऊन दुसरी येईपर्यंत आशाताईंनी (किंवा त्यांच्या पुरुष नातेवाईकांनी) सिमकार्ड बदललेलं असायचं. अशा वेळी त्यांच्यापर्यंत मीटिंगचा निरोप पोहोचवणं ही मोठीच कसोटी असाचची. मग त्या गावातला इतर कुणी परिचित शोधून तो निरोप त्या आशाताईंपर्यंत पोहाचायचा. एका मीटिंगच्या संपर्कासाठी तब्बल आठ दिवस आधी तयार सुरु व्हायची. तरीही सगळ्या आशांपर्यंत निरोप पोहोचलाय असे व्हायचे नाही.

सुरुवातीच्या एका मीटिंगची आठवण रुपाताई सांगतात. सगळी तयारी करुन वर्षाताई, शैलाताई आणि अन्य मंडळी मिटिंगसाठी शिरुरला पोहोचली तर फक्त १०-१२ अशा हजर. फोनवर तर सगळ्या येतो म्हणाल्या होत्या. चौकशी केल्यावर कळलं की आरोग्य विभागाच्या त्यांच्या पध्दतीनुसार त्यांच्या पध्दतीनुसार त्यांच्या वरिष्ठांनी मीटिंगबद्दल कळवायला हवं ! पुढच्या मीटिंगपासून ही पध्दत अवलंबली. ‘दुहेरी’ संपर्क साधायला सुरुवात केली आणि हजेरी वाढली.

कधी कधी तर मीटिंग च्या दिवशीही फोन करावे लागायचे, मीटिंगची आठवण द्यावी लागाची. पण रुपाताईंनी हे न कंटाळता केलं. पुष्कळदा काही जणी ती माहिती भरताना आईचे वय २५ आणि मुलीचे २० अशा गमतीशीर चुकाही करत. मग ते फॉर्म पुन्हा भरुन घ्यावे लागत. मुलींना या प्रकल्पात ‘ ओळख स्वत:ची’ हे पुस्तक वाचायला देऊन त्यावर त्यांचा प्रतिसाद घ्यायचा होता. तर काही अशा चक्क एकमेकींची कॉपी करुन आणत. या सगळ्या कागदोपत्री कामांच्या मानसिकतेमधून आशांना बाहेर काढायला सुरुवातीला बरेच कष्ट पडले. माहिती खरी हवी. काम प्रत्यक्ष करायला हवं हे सारं पटायला वेळ लागला. पण जेव्हा प्रकल्पाचा उद्देश त्यांच्यापर्यंत पोहोचला तेव्हा त्या अत्यांत प्रामाणिकपणे आणि उत्साहाने काम करु लागल्याचं रुपाताई सांगतात. अर्थात याला शालन बडे किंवा मुक्ता गीते यांसारखे काही आशाताईंचे अपवाद होते. त्या स्वत: फोन करुन मीटिंगबद्दल विचारत स्वत:सोबत शेजारच्या गावांतील आशाताईंना घेऊन येत.

मुलींशी संपर्क करणंही असंच कठीण होतं. त्यांचे ही फोन नंबर सतत बदलत. कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी मुलींना तयार करणं हे मोठं आव्हान होतं. त्यासाठी सतत फोन करावे लागले. ब्यटी पार्लर, कम्प्युटरसारखे कोर्स मुलींनी सहज निवडले पण नर्सिंग, ड्रायव्हिंग, हॉटेल मॅनेजमेंट यांसारख्या कोर्सला मुलींशी खूप वेळा चर्चा करावी लागली. पण अखेर कौशल्य प्रशिक्षणही यशस्वी झालं. अनेक मुली त्यांच्या आवडीचे अभ्यासक्रम निवडून ते यशस्वीपणे पूर्ण करुन त्या अर्थार्जनही करु लागल्या आहेत.

या प्रकल्पाल साताऱ्याहून शिरुरच्या अंतर्गत भागात संपर्क करायचे होते. वारंवार मीटिंग, अनेक कार्यक्रम मेळावे जनसुनावणी यासाठी रुपाताईंना न थकता पुन: पुन्हा संपर्क केला. मुलींचं आयुष्य बदलत गेलं आणि संपर्कांची साखळी अखेर पूर्ण झाली.

# कलावंत कार्यकर्ता

कैलास जाधव

चळवळीत काम करताना वेगवेगळी कला माध्यम गरज ओळखून
कल्पकतेने वापरली की त्यांचा परिणाम खूप मोठा असतो.
कैलास जाधवने शिरुरमध्ये हेच केलं.

' लेक लाडकी अभियाना'चा कैलास जाधव हा जुना कार्यकर्ता. शाहिरी पठडीतला खणखणीत आवाज. अनेक वाद्यांवर हुकूमत आणि पथनाट्यांसारख्या माध्यमांत अनेक प्रयोग केलेला हा कलाकार. त्यामुळे या सगळ्या गोष्टींचा परिणामकारक वापर शिरुर तालुक्यातील किशोरींसाठीच्या प्रकल्पासाठी करणं गृहीतच होते.

हा प्रकल्प सुरु णाला तेव्हा या भागातल्या बालविवाहाच्या समस्येचं गांभीर्य समोर आलं. कैलासने त्या विषयावर लघूपट तयार करायचं ठरवलं. कथा, पटकथा त्यानेच लिहिली. वडील आपल्या शाळकरी मुलीचं लग्न तिच्यापेक्षा वयाने कितीतरी मोठ्या असलेल्या पुरुषासोबत लावतात. नंतर तिची आज या मुलीच्या पाठीशी उभी राहते आणि तिची या लग्नातून सुटका करते. तिची शाळा पुन्ह सुरु होते. अशी ती गोष्ट आहे. मुलीच्या वडिलांची भूमिका कैलासने स्वत: केली होती. आजीच्या भूमिकेत वर्षाताई होत्या. हा लघूपट घेऊन ते शिरुरमध्ये गेले. आधी काही गावांत स्वत: जाऊन तो दाखवला. पडद्यावरची माणसं समोर दिसतात.



याचं लोकांना अप्रुप वाटायचं. तो विषय, त्यातली पात्रं लोकांना प्रचंड जवळची वाटायची. लघुपट पाहताना अनेकदा लोकांच्या डोळ्यांत पाणी यायचं. लोक या विषयावर चर्चा करायचं नंतर रिक्षामधून टिव्ही संच, जनरेटर नेऊन गावोगावी, शाळांमध्ये हा लघुपट दाखविला गेला. रिक्षावर लेक लाडकी अभियानानं बॅनर लावलेलं असायचं. टुरिंग थिएटरसारखा गावोगावी हा लघुपट पोहोचला. तालुक्यात या लघुपटाचे २०० हुन जास्त प्रयोग झाले. बालविवाहाच्या प्रश्नावर मतपरिवर्तन करण्याच्या प्रक्रियेत हा लघुपट सवाृत

मोठा घटक ठरला. तो पाहून अनेक गावांत पालकांनी मुलींची ठरलेली लग्न थांबवली. मुलींची लग्नं १८ वर्ष पूर्ण होण्याआधी ठरवली. यात आपली चूक झाल्याची कबुली अनेक पालकांनी जाहीरपणे दिली.

प्रकल्पासाठी पथनाट्ये करायचं ठरलं होतं. त्यात स्थानिक मुलींनी काम करणं अपेक्षित होतं. पण मुलींनी कधीच पथनाट्य पाहिलंही नव्हतं. मग त्यात काम करणं वगैरे दूरची गोष्ट. म्हणून त्यांना प्रशिक्षण द्यायचं ठरवलं. प्रशिक्षण देण्यासाठी नाट्य क्षेत्रातल्या लोकांशी संपर्क करायचं ठरवलं पण त्यांनी सांगितलेले मानधनाचे आकडे आवाक्याबाहेरचे होते. मग कैलासने स्वत:च ती जबाबदारी अंगावर घेतली. त्याने तीन दिवस शिरुरमध्ये मुलींचे प्रशिक्षण शिबीर घेतले. यात मुलगेही होते. या प्रशिक्षणात अनेक वेगळे अनुभवही समोर आले. मुलं-मुली बोलणं टाळत. एकमेकांच्या शेजारी उभे राहत नसत. हातात हात घेऊन फेर धरणे वगैरे अशक्यच होते. गाण्याचा ठेका त्याना कळत नसे. अशा सगळ्या अडचणींवर मात करुन अखेर पहिलं पथनाट्य उभं राहिलं. त्याच नाव होते ' लहान मुलींना नवरी नका समजू' औरंगाबादला आयुक्तांच्या कार्यालयात याचा प्रयोग झाला. मुलींचे कौतुक झालं ' माझ्या शरीरावर माझा अधिकार' नाही म्हणायला शिका अशी आणखी पथनाट्येही बसवली. मुलांना हे माध्यम समजलं, त्याची ताकद समजली. प्रयोग होत गेले तसेच अधिक सफाईदारपणे त्यांनी ते पुढे नेलं. गावागावत प्रयोग झाले. गावकरी ते बघून इतके प्रभावित व्हायचे की मुलांना तिथल्या तिथे बक्षिसे देत खाऊ वाटत यानंतर मुलांनी कैलास सोबत नसताना स्वतंत्रपणे प्रयोग केले. बीडच्या प्रयोगानंतर प्रज्ञा आणि सारिका या मुलींचे अभिनय बघून प्रेक्षक हेलावले. मुलींच्या वृत्तवहिन्यांवर मुलाखती झाल्या.

पथनाट्य करणाऱ्या मुलींना इतका आत्मविश्वास आला की मला शिकायचं आहे, स्वत:च्या पायावर उभी राहिल्याशिवाय लग्न करायचं नाही,' हे अनेकींनी घरात ठणकावून सांगितलं !

त्यानंतर टप्पा होता एकांकिकेचा ' फाईव्ह डब्ल्यू वन एच' हे त्या एकांकिकेचं नाव. हे खरं तर आधी पथनाट्य होतं. त्याच प्रयोगही खूप गाजले. मुली त्यांचे स्वत:चेच प्रश्न मांडत होत्या. त्यामुळे त्या जीव ओतून काम करायच्या. एरव्ही शाळेत मान वर करुन न पाहणारी मुलगी पथनाट्यात घडाघडा बोलताना बघून शिक्षकही आश्चर्यचकित झाले. त्यात सोनीची भूमिका करणारी सोनाली बडे इतकी समरसून काम करायची की प्रयोग संपल्यावर तिच्याभोवती चक्क गर्दी व्हायची. मुली तिच्यात स्वत:ला पाहयच्या. याच पथनाट्याची नंतर एकांकिका झाली.

साताऱ्यात प्रसिध्द समर्थ एकोकिका स्पर्धेत' ही एकांकिका उतरवायचं ठरवलं तेव्हा कैलास जरा साशंकच होता. पथनाट्य तुलनेतनं सोपं, त्याचा बाज वेगळा इथे मुली स्पर्धेत उतरुन रंगमंचावर किती टिकाव धरतील याबाबत शंका होती. तरीही प्रयोग करायचं ठरलं. शिरुरहून मुली साताऱ्यात दाखल झाल्या. त्यांना आधी नाट्यगृहात नेऊन नाटक नेमकं कसं असतं ते दाखवलं. मुली आयुष्यात पहिल्यांदाच नाटक बघत होत्या. रंगमंच, पडदा, माईक, लाइट हे सगळं त्यांना नवं होतं. एका महाविद्यालयाच्या रंगमंचावर त्यांची रंगीत तालीमही घेतली गेली. मुलींचा आत्मविश्वास वाढला. कैलासने त्यांना लाईट मंच्यावर वावर, उभे राहण्यासाठीच्या खुणा वगैरे तांत्रिक गोष्टी समजावल्या.

प्रत्यक्ष प्रयोगाचा दिवस उजाडला. मुलींना थोडी धाकधूक वाटत होती. पण त्या रंगमंचावर गेल्या आणि तांत्रिक बाजूंचे दडपण न धेता त्यांनी भान हरपून एकांकिका सादर केली. प्रयोग संपला. सगळे प्रेक्षक उभे राहून टाळ्या वाजवत होते. कितीतरी वेळ कडकडाट सुरु होता. आयुष्यात पहिल्यांदा रंगमंचावर जाऊन सादर केलेली एकांकिका स्पर्धेत जिंकली होती. मुलींनी स्वत:ला सिद्ध करुन दाखवलं होत ! त्या प्रयोगानंतर अनेक संस्थांनी मुलींना निमंत्रण दिलं. मानधन देऊन प्रयोग झाले. या एकांकिकेत प्रमुख भूमिका करणारी सोनाली तर सातार परिसरात प्रसिध्द झाली ! एखाद्या अभिनेत्रीसारखं कौतुक तिच्या वाट्याला आलं. पथनाट्य, एकांकिका, लघुपट अशी वेगवेगळी माध्यमं कैलासने अत्यंत प्रयोगशील पध्दतीने वापरली. बदल घडवण्यासाठी तर ती महत्त्वाची ठरलीच पण ज्यांच्यासाठी हा प्रकल्प होता त्या मुलींनाच यात सहीागी करुन घेतल्याने याची परिणामकारकता कितीतरी पटीने वाढली.

बदलाच्या वाटेवर संघर्ष असतोच पण त्याला जनजागरणाची जोड दिली तर घडणारे बदल हे व्यक्तीला आतून बदलवून टाकतात. कैलासच्या प्रयत्नांमधून शिरुरमध्ये नेमकं हेच घडलं. तिथल्या किशोरवयीन मुली बदलल्या आणि स्वत:च्या आयुष्याची लढाई समर्थपणे लढायला सक्षमही झाल्या ! एक कलावंत कार्यकर्ता म्हणून कैलासला समाधान आहे ते याचंच !

# संघर्षाच्या शिलेदार

अॅड. शैला जाधव

लेक लाडकी अभियानाने आजवर केलेले अनेक संघर्ष कधी व्यवस्थशी होते. तर कधी सरकारी यंत्रणेशी होते पण शिरुरमध्ये वेगळंच काही साध्य करायचं होतं. अॅड. शैला जाधव यांनी सहाकाऱ्यांच्या सोबतीनं नेहमीच्या जिद्दीने ते करुन दाखवलं

अॅड. शैला जाधव या ' लेक लाडकी अभियानातलं जुनं जाणतं नाव. अनेक चळवळी आणि संघर्षामधल्या त्या आघाडीच्या शिलेदार. शिरुर तालुक्यात किशोरी गटातील मुलींसाठी काम करायचं ठरलं तेव्हा ठरलेला वयोगट होता. ११ ते १९ प्रत्यक्ष मुलींच्या भेटीगाठी सुरु केल्या तेव्हा लक्षात आलं, १८ वर्षांवरील मुली कमी आहेत. कारण स्पष्ट होतं. बहुतांश मुलींची लग्न झालेली होती ! या परिसरातील



बालविवाहाच्या समस्येला सुरुवातीलाच सामोरं जावं लागलं ते हे असं. लग्न झालं असतलं तरी याही किशोरीच होत्या आणि त्यांच्या समस्या अधिक गंभीर होत्या. त्यामुळे त्यांना या प्रकल्पात सहभागी करुन घ्यायचं ठरलं. मुलींना एकत्र करुन एक किशोरी मेळावा घेतला. तो प्रचंड यशस्वी झाला. यावेळी लेक लाडकी अभियानाने बालविवाहाच्या विरोधात थेट भूमिका मांडली आणि मुलींचे विवाह सज्ञान होण्यापूर्वी करणं चुकीचं असल्याचं ठामपणे मांडलं. बालविवाह ही सामान्य बाब आहे असे समजणाऱ्या समुहासमोर प्रकल्पाला सुरुवात करतानाच हे मांडणं हे खूप धाडसांच होतं असे शैलाताई सांगतात.

मेळावा यशस्वी झाला होता, कामही प्राथमिक पातळीवर सुरु झालं होतं. पण त्याच वेळी काही स्थानिक लोकांनी वेगळीच भूमिका घेतली. आमच्या तालुक्यात बालविवाह होतच नाहीत असा त्यांचा दावा होता. हे बाहेरुन आलेले लोक नसलेले प्रश्न निर्माण करत आहेत असं त्यांच म्हणणं होतं. या

लोकांना उत्तर देण्यासाठी अभियानाने एक ७३ नावांची यादीच सादर केली. यात लग्न ठरलेल्या अल्पवयीन मुलींच्या नावांचा समावेश होता. यातल्या मुली आणि मुलांच्या पालकांना वर्षाताई, शैलाताई प्रत्यक्ष भेटल्या. त्यांचं मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला.अगदीच ऐकलं नाही त्यांना कायद्याचा धाक दाखवला. काही लग्नाच्या पत्रिका आधीच छापून तयार होत्या. काही ठिकाणी लग्नाची खरेदी पूर्ण झाली होती. एका लग्नात तर मांडवही घातला होता. गावातल्या नेते मंडळींच्या भेटी घेऊन त्यांना समजावलं. त्यांनी मध्यस्थी केली. बाल विवाहांत गावातल्या नेतमंडळींनी भेटी घेऊन त्यांना समजावलं. त्यांनी मध्यस्थी केली. बाल विवाहांत गावातल्या नेतमंडळींनी हजेरी लावू नये, अशी विनंतीही करण्यात आली. त्यानी ती मान्यही केली. शैलाताई एक प्रसंग सांगतात. एक बालविवाह होताय असं कळल्यावर तिथं सगळी टीम पोहोचली. मुहूर्त जवळ आला होता. मंडप भरलेला होता. तणावाचं वातावरण तयार झालं. मुलीचा शाळेचा निर्गम उतारा पहिला तर दोनच दिवसांपूर्वी त्या मुलीला १८ वर्षे पुर्ण झाली होती. मग लग्न लावून वधू-वरांना आशीर्वाद देऊनच बाहेर पडावं लागलं. असे प्रसंग घडले तरी प्रयत्न सुरुच राहिलं. या यादीतली बहुतांश लग्नं रोखण्यात यश आलं. पण त्यातले २० विवाह रोखता आले नाहीत. लोक गावाच्या बाहेर, एखाद्या देवस्थानावर जाऊन गुपचूप लग्न उरकत. काही तर जिल्ह्याबाहेर जात. पोलिस यंत्रणा कामाला लावूनही त्यांचा पाठपुरावा करणं अवघड होतं. ज्यांचं लग्न थांबलं यातल्याच काही मुली स्वत:हून कौशल्य प्रशिक्षण घ्यायला तयार झाल्या. काही मुलींना घरी जाऊन पालकांशी चर्चा करुन तयार करावं लागलं. प्रश्न होता ज्यांच लग्न झालं होतं. त्यांचा. वय १८ पेक्षा कमी असलेल्या अशा अनेक बालवधू शिरुर तालुक्यात होत्या. कायद्याचा बडगा दाखवून विवाह अवैद्य ठरवले असते तर मुलींना तिच्या कुटुंबाला समाजात वावरणं अवघड झालं असतं. अशा वेळी वर्षाताई आणि शैलाताईंनी मधला मार्ग काढला या मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणणं, त्यांच्यावर इतक्यात मातृत्वाची जबाबदारी पडणार नाही, हे पाहणं, त्यांना कौशल्य प्रशिक्षण देणं असे मार्ग काढले. विवाहित मुलींच्या सारसच्या मंडळींशी, त्यांच्या पतीशीही बोलावं लागलं. त्यांच प्रबोधन केल्यावर अनेकजण तयार झाले. त्यातल्या काही कौशल्य प्रशिक्षणासाठी आल्याही प्रकल्पाच्या अखेरीस जनसुनावणी घेण्यात आली. बालहक्क आयोगाने बालविवाहांच्या घटनांबाबत सुमोटो दाखल करुन घेऊन गंभर दखल घेतली. गावागावात बालसंरक्षण समित्या फक्त नावालाच नेमल्या होत्या. वर्षाताई आणि शैलाताई यांनी गावागावांत जाऊन ग्रामसभेत

या समित्यांवर असलेल्या जबाबदाऱ्यांची जाणीव करुन दिली. तालुक्यातील ५३ गावांमध्ये बालहक्क संरक्षण समित्यांचे फलक तयार करुन दिले. त्यावर सदस्यांची नावे लिहिली. त्यामुळे ग्रामस्थ आणि स्वत: सदस्य यांना त्यांच्यावरच्या जबाबदारीची जाणीव झाली. त्यांचे प्रशिक्षण घेण्यात आलं. कायद्याची माहिती दिलीच पण बालविवाह रोखण्यासाठी काय करायला हवं. याचीही माहिती दिली. गावात होणाऱ्या विवाहांना ही समितच कशी अंतिमत: उत्तरदायी आहे हे बजावलं. यातून दुर्दैवाने एखादा बालविवाह झालाच तर काय करायचं, याबद्दलही सांगितलं, त्यानंतर झालेल्या कौशल्य प्रशिक्षणात जशा अविवाहित मुली आल्या, तशा विवाहित, घटस्फोटित, विधवा अगदी लहान मूल आईकडे ठेवूनही आलेल्या किशोरी माताही होत्या. आता पालकही त्यांची चूक मान्य करुन मुलींच्या मागे ठामपणे उभे आहेत. या सगळ्या घडामोडींची शिरुरच्या न्यायालयाने गंभीर दखल घेतली. न्यायाधीशांनी बालविवाहाशी निगडित असलेल्या सगळ्या घटकांची एक बैठक बोलावली. ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, अशा सेविका, सरपंच, आरोग्य अधिकारी, पोलिस या सगळ्यांना बोलावून त्यांनी संबंधित गावात एखादा बालविवाह झाल्याचं समोर आलं तर त्यांना थेट जबाबदार धरलं जाईल असं बजावलं. शिरुरमधील एकूण आर्थिक, सामाजिक, परिस्थिती पाहता कायद्याचा बडगा उभारुन उपयोग नव्हता. त्यामुळे समुपदेशन, मुलींच्या शिक्षणासाठी मदत आणि आर्थिक स्वावलंबनासठी कौशल्य प्रशिक्षण या त्रिसुत्रीवर काम केलं. मुली बदलल्याच पण पालकही बदलले. मुली गाडी चालवतात, कम्प्युटरवर काम करतात, रुग्णालयात आत्मविश्वासाने रुग्णसेवा देतात आणि मुख्य म्हणजे चुकीच्या गोष्टींना नाही म्हणतात, हे खूप मोठे बदल होते, असे शैलाताई अभिमानाने सांगतात.

शिरुरमध्ये वावरतात तो बदल प्रत्यक्ष दिसतो आहे, गावं बदलताहेत. आधी बालविवाह ही सामान्य गोष्ट होती. गावातल्या नेत मंडळींची नावं पत्रिकेत असायची. ही मंडळी लग्नात मिरवायची. आता अशा लग्नांबद्दल हे लोक सजग झाले आहेत. उलट असे विवाह गावात होणार नाहीत. याची दक्षता ते घेतात. आरोग्य विभागला, बालविकास विभागाला विनंती करुन विवाहीत किशोरी आढळल्या तर माहिती देण्याची, त्यांच्या योजनांमध्ये सहभागी करुन घेण्याची विनंती करण्यात आली. मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, तलाठी यांच्याही कार्यशाळा झाल्या. गावांतले किराणा दुकानदार विवाह लावणारे पुरोहित, फोटोग्राफर, बँडवाले, मांडपवाले, आचारी, कापड दुकानदार अशा सगळ्यांना बालविवाह रोखण्याच्या कामांत

सहभागी करुन घेतलं. त्यांन त्यांच्या जबाबदारीची जाणीव झाली. प्रकल्प सुरु होताना आमच्याकडे बालविवाह होतच नाहीत असं म्हणणारे आता हा कसा गंभीर प्रश्न आहे, असं म्हणू लागले.

शिरुर बदलताना पाहणं हे वेगळं समाधान असल्याचं शैलाताई सांगतात. मोठी माणसं बदलतील, कदाचित त्यांना वेळ लागेल पण मुली मात्र वेगाने बदलत आहेत. स्वत:चं आयुष्य कसं असायला हवं ते ठरवण्यासाठी त्या आग्रही आहेत. त्यांना शिकायचं आहे, कुटुंबाला हातभार लावायचा आहे. दुष्काळग्रस्त शेती आणि ऊसतोडणीच्या कष्टांतून आई-वडिलांना बाहेर काढायचं आहे. शिरुरच्या मुली स्वप्नं बघू लागल्यात आणि त्या पूर्ण करण्याच्या वाटेवर आम्ही त्यांना आणू शकलो, याचं समाधान मोठं असल्याचं शैलाताई सांगतात.

हे कोणते नवे तू गीत गात आहे
का आज त्या कळ्यांचे रंग आगळे आहेत
मी तर फक्त कारण आहे
बदलास तुझ्या तुझीच इथे साथ आहे





# पंख फुटलेल्या मुली

लेक लाडकी अभियानाच्या कार्यकर्त्यांनी ७३ बालविवाह रोखले. योग्य प्रबोधन केल्यावर काही विवाह पालकांनी स्वत:च थांबवले. मुलींना शाळेत जाण्यासाठी सायकली, गावापर्यंत एसटी बस नेण्यासाठी यशस्वी प्रयत्न, पडलेल्या शाळेच्या दुरुस्तीसाठी पाठपुरावा, शाळेची नवी इमारत असे शिक्षणासाठीचे प्रयत्न झाले. मुलींना आरोग्य प्रशिक्षण मिळालं. त्या स्वत:विषयी अधिक सजग झाल्या. या बदलात ॲड. वर्षा देशपांडे आणि त्यांचे कार्यकर्ते, या निमित्ताने अभियानाशी जोडलेले तज्ज्ञ मार्गदर्शक, अभियानाची जबाबदारी वाहणारी स्थानिक माणसं, मुली, मुलींचे पालक असे एक कुटुंब तयार झाले आहे. या प्रवासात आलेला अनुभव शब्दबध्द करण्याचा हा छोटासा प्रयत्न.